अक्षरधारा 43

दिल-ए-घाटीका

E-MAGAZINE

43 Years of Memories

"The Bond
We Share...
The Memories
We Cherish...
The Journey
Continues..."



1983 TO FOREVER




Those were the days...!

ANATOMY
PHYSIOLOGY
MEDICINE
SURGERY

REUNITING HEARTS
REVIVING MEMORIES

FRIENDSHIP | RESPECT | MEMORIES | LIFELONG BOND

STARS THAT LEFT OUR SKY TOO SOON



बुध्दीमान तारे
अर्ध्यावर निखळले
कर्तव्य, सेवा करून गेले
चटका मनाला लावून गेले
हुरहूर जीवाला, सांगू कुणाला
देवाचा न्याय, कळला कोणाला ?
जो आवडे सर्वाना, तो आवडे देवाला
आत्मशांतीची प्रार्थना मनोमन
याचसाठी देवा हे नंमन !!!

🙏

वर्षा पाटील-देशपांडे



प्रिय मित्र – मैत्रिणींनो,

सप्रेम अभिवादन,

अक्षरधारा चा अंक तुमच्यासमोर सादर करताना आम्हास खूप आनंद होत आहे.

सन १९८३ ते १९८८ या मंतरलेल्या दिवसांच्या आठवणीं मध्ये तुम्हा सर्वांना पुन्हा घेऊन जाताना मन भरून आलेले आहे.

या आठवणी लिहून पाठवताना तुमचेही मन किती भावनांनी ओतप्रोत भरलेले आहे हे लक्षात आले. इतक्या वर्षांनी ही या आठवणी आणि घटना काल परवाच घडले आहेत इतक्या ताज्या वाटतात.

बऱ्याच जणांनी त्यांच्या आठवणी लिहिल्या आहेत. या आठवणी मैत्रीच्या, काही खेळण्यांमधील प्रसंगाच्या, संगीत रजनीच्या, नाटकाच्या आहेत. काहींनी आपल्या व्यवसायाच्या व्यतिरिक्त इतरही क्षेत्रांमधील काम करीत असलेल्या अनुभवाचाही उल्लेख केलेला आहे. काहींनी प्रवास वर्णन ही लिहिलेले आहेत. या सर्व आठवणी व प्रसंग आपले जीवन व मैत्री समृद्ध करते.

आपल्या जीवनामध्ये अनेक जणांशी आपले संबंध येतात. काही संबंध हे आयुष्यभर आपली साथ देत असतात. या संबंधातली आठवण आपल्याला कायम आनंदी ठेवत असते. हा आनंद आपला आयुष्यातील अनमोल ठेवा आहे. आपल्या सर्व वर्ग मित्र मैत्रिणींच्या आठवणी याच आपल्या आनंदाचा भाग आहे. या आठवणी आपल्याला वयाचे बंधन न ठेवता चीरतरुण ठेवतात. २३ २४ व २५ ऑक्टोबर या स्नेहमिलनात हा आनंद आपण द्विगुणित करणार आहोत. एका संशोधनात हे सिद्ध झाले आहे की अशा प्रकारच्या नातेसंबंधात राहणे हे आयुष्य दीर्घकालीन होण्याचे लक्षण आहे.

याप्रसंगी आपल्याला शिकवायला असलेला शिक्षकवृंद हा उच्च दर्जेचा होता. त्यामुळे आपले वैद्यकीय शिक्षण उत्तम झाले व व्यवसायामध्ये आपण समृद्ध झालो. त्या सर्व शिक्षकांचे स्मरण करून अभिवादन करूया.

आपल्या या प्रवासात सयाजी साळुंके, अंजली इंगळे, किरण पाटील व भास्कर टेंगसे दुर्दैवाने सोडून गेले. त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन.

आपल्या सर्वामधील मैत्रीभाव व स्नेह असाच वृद्धिंगत व्हावा व वाढत राहावा या शुभेच्छासह...

ता.क.श्री संजय व्यापारी यांनी आमचा सतत चा त्रास सहन करून ऐनवेळीची एडिशन्स घेऊन सुबक अंक दिल्याबद्दल त्यांचे आभार .

क्रांती रायमाने आणि टीम इ मॅग्झिन

– संपादक

संपादकीय मंडळ

- अंजली परांजपे-मणेरीकर
- क्रांती रायमाने
- कल्पना सुकळकर -देवणे
- वर्षा कुलकर्णी-देशपांडे
- अनिल शिंदे
- स्वप्ना देशपांडे

प्रकाशक – **ज्योतिर्मय प्रकाशन, पुणे**
मो.७७४३८१८५५९

अनुक्रमाणिका

रम्य आठवणी

* मनोगत (३)
* रात्रीस खेळ चाले.... (४)
* यादगार सफर.. कॉलेज दिनोका... (५)
* In respect of Teachers (7)
* लेडी सिंघम (७)
* मै हुं... डॉन (८)
* Gori hai kalaaiya … And the thrill follows (10)
* हुडुत !!! (११)
* Echoes of the Wards and Bappa's Grace (13)
* वो दिन भी क्या दिन थे... (14)
* Golden Memories of Hostel Life (16)
* Golden Era (18)
* ठकूताईचा चहा (१९)
* South India Trip From Internship Savings (20)
* Ghati Gardi! The moments I remember! (21)
* मैत्र जिवांचे... हम सात (२३)
* संकीर्ण आठवणी (२४)
* Role model : Me? Or you? (25)

जीवन प्रवास

* CROSSROADS AND ROADS NOT TAKEN (26)
* A reluctant doctor and a very reluctant OBGYN (28)
* माझ्या आयुष्याची खरी कमाई शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद – १९८३ बॅच (३०)
* From Latur to Medicine, America, and AlzhaTV (32)
* INTERNSHIP TO INTERNET TO INTELLIGENCE (A.I.) (34)
* माझा हिस्टेरोस्कोपी प्रवास (३६)
* My journey - Eyesight to Insight (38)
* Week One, Almost Gone (40)

कविता

* फिर उसी राह पर मिलें हम..... (४१)
* बॅच ८३ (मेडिकल) (४१)
* दिल है घाटीका (४२)
* आम्ही डॉक्टर (४२)
* सारी उमर हमे साथ रहना है (४३)
* आठवणींच्या हिंदोळ्यावर..... (४३)

देखणे वळण

* नादब्रह्माच्या वाटेवरील मी प्रवासी (४४)
* असेही एक वळण.... (४६)


प्रेरणा

* अजून चालतेची वाट (४९)
* The Golden Batch of '83 (51)

जडणघडण

* Debt A Journey of Faith, Friendship, Surgery and Service (53)
* डॉक्टर म्हणून घडण्याचा काळ १९८३–१९९० (५६)
* Going back to our MBBS days (58)
* 1983, The Dream: Growing Up To Be A Doctor! (59)
* NSS रुममधील मंतरलेले दिवस! (हॅलो) (६०)
* बॅचमधील काही प्रेरक व्यक्तिमत्वे... (६२)
* Then N Now (64)





डॉ. विजय सिकची

मनोगत

आज तब्बल ९ वर्षांनी आपल्या वैद्यकीय शिक्षणातील सहकाऱ्यांचे स्नेह - मिलन होत आहे व जवळपास ४३ वर्षांचा सहवास असलेले सर्व सहकारी भेटत आहेत ही आपल्या सर्वांसाठी आनंदाची, अभिमानाची आणि भावनीक बाब आहे ..

इतक्या वर्षांचा प्रदीर्घ काळ लोटला, तरी वैद्यकीय महाविद्यालयातील ते दिवस, आपल्या मैत्रीच्या आठवणी आणि एकत्र केलेला संघर्ष आजही मनात ताजेच आहे, त्या काळात आपण सर्वजण वैद्यकीय शिक्षणाच्या एका समान ध्येयाने एकत्र आलो होतो. अभ्यासाचा ताण, परिक्षांची धावपळ, रुग्णालयातील रात्रपाळ्या, क्लीनिकल पोस्टिंग, रुग्णांच्या विविध आजारांचा अभ्यास आणि प्राध्यापकांचे मार्गदर्शन या सगळ्या अनुभवातून आपली वैद्यकीय जडण-घडण झाली. त्याचबरोबर एकमेकांना केलेली मदत, अडचणीच्या वेळी दिलेला धीर आणि मित्र म्हणून केलेली साथ यांमुळे आपल्या मैत्रीची पायाभरणी झाली. महाविद्यालयातून बाहेर पडल्यानंतर प्रत्येकाने वैद्यकीय क्षेत्रांत आपापल्या परीने वाटचाल केली. कुणी क्लिनीकल प्रैक्टिस मधे उत्कृष्ट काम केले, कुणी शासकीय सेवेत योगदान दिले, कुणी अध्यापन व वैद्यकीय शिक्षणाची धुरा सांभाळली, तर कुणी विविध वैद्यकीय शाखामधे विशेष प्राविण्य मिळवले. अनेकांनी हजारो रुग्णांची सेवा केली, असंख्य कुटुबांना आधार दिला आणि आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या आरोग्यासाठी केला. हा आपला प्रवास केवळ व्यवसायिक यशाचा नाही, तर रुग्ण सेवेचा आणि माणुसकीचा प्रवास आहे.

आज इतक्या वर्षानंतर आपण पुन्हा एकत्र आलो आहोत. काळाने आपल्या केसामधे पांढरेपणा आणला असेल, अनुभव वाढवला असेल, पण एकमेकांना भेटल्यावर मन पुन्हा त्या विद्यार्थी जिवनात जाऊन पोहोचते. जुन्या आठवणी सांगतांना चेहऱ्यावर उमटणारे हास्य आणि मित्रांना भेटल्याचा आनंद हीच आपल्या मैत्रीची खरी ताकद आहे.

या स्नेहमीलना मुळे आपल्या जुन्या नात्यांना नव्याने उजाळा मिळाला आहे. या क्षेत्रांत काम करतांना आलेले अनुभव, यश-अपयश, आव्हाने आणि समाधानाचे क्षण एकमेकांशी शेअर करण्याची ही सुंदर संधी आहे. आपल्या क्षेत्रातील बदल त्या काळाबद्दल चर्चा करतांना पुढील पिढीला मार्गदर्शन करण्याची जबाबदारीही आपली आहे, याची जाणीव होते.

या सुंदर स्नेहमिलनाचे आयोजन करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचे मनपूर्वक अभिनंदन. आपल्या सर्वांची मैत्री, आपुलकी आणि परस्पर स्नेह असेच कायम राहो.

भविष्यातही आपण वेळोवेळी एकत्र येवू, जुन्या आठवणींना उजाळा देऊ आणि आपल्या अनुभवांचा उपयोग समाजासाठी करत राहु हीच मनापासून इच्छा.

हा ४३ वर्षांचा काळ मागे पडला असला, तरी आपल्या मैत्रीचे नाते आजही तितकेच जिवंत आहे हीच या स्नेहमिलनाची सर्वांत मोठी आणि अमुल्य कमाई आहे.





डॉ.शाम कुलकर्णी

रात्रीस खेळ चाले....

आपल्या बॅच मध्ये लायब्ररी मध्ये अभ्यास करण्यासाठी खूप ओढ होती. सकाळी ९ वाजता हॉल उघडताच आवडीची जागा मिळवण्याची आणि जास्तीचे कुशन मिळवण्यासाठी (पळविण्यासाठी) स्पर्धा सुरू होत असे. मोजके अभ्यासू सोडून दिवसभर लायब्ररीचे पुस्तक फक्त अभ्यास करताना दिसत. तळघरात शेट्टीकडे चहाच्या चकरा, टेन्शन आले म्हणून, मित्राला सिनेमा, जेवण कंपनी म्हणून बाहेर पडले की लायब्ररी बंद झाली तरी पुस्तक टेबलवर तसेच. रात्री १०.३० ते ११ दरम्यान कॅन्टीन बंद होण्याआधी शेवटचा चहा घेण्याची अंधारात पळापळ (कॅरिडॉर लाईट बंद)

कथा: अशी एक रात्र मी, सुनील जावळे, बिरादार आणि.. कॅन्टीन कडे जाताना सुनीलने सिनेमाची पैज लावली मधल्या जिन्यामध्ये वर जाऊन तिसऱ्या मजल्या वर डिसेक्शन हॉल पासून एचओडी रूमपर्यंत जाणे आणि खाली पोर्च मध्ये सगळ्यांना हाक देऊन परत येणे.

मी निर्जीव वस्तूंना घाबरत नाही असे सांगून मी तयार झालो. लिफ्टसमोरील जिन्यामध्ये मोजकाच लाईट चालू बाकी सर्व अंधार. मी धावत वरती जिना चढत निघालो आणि पहिला मजला पूर्ण करून पुढे जात असताना खाली लाईट बंद झाला (केला?) आता मात्र पूर्ण अंधार झाला. मी तसंच पुढे पळत जिना चढून जात होतो, मनामध्ये आता दडपण निर्माण झाले आणि परतीचा प्रवास सुखाचा असणार नाही याची जाणीव झाली तसे शरीराचा प्रत्येक भाग त्याचे अस्तित्व दाखवू लागला छातीची धडधड वाढली, श्वास गति स्पष्ट जाणवू लागली आणि पायाला गोळे आले. तिसरा मजला गाठला डिसेक्शन टेबलवरील निर्जीव बॉडी ची मला काळजी न्हवती पुढे जाऊन एचओडी रूमपर्यंत पोहचलो आणि खाली पोर्च मध्ये सगळ्यांना हाक मारली, अपेक्षा केल्याप्रमाणे खाली कोणीच न्हवते. आता दडपण वाढले ते सजिव कोठे काय करतील? क्षणभर मनात विचार आला इथेच बसून रहावे आणि सगळे हुडकत वर येतील पण हिंमत झाली नाही.हळूहळू एक एक पाऊल पुढे जात सर्व बाजूला हालचालीकडे लक्ष ठेवून जिन्यावरून खाली उतरण्यास सुरू केले, प्रत्येक मजल्यावर कॅरिडॉर मधून कोण आहे का याचा अंदाज घेत प्रचंड दडपण आले होते. पहिल्या मजल्यावर जिन्यातील लहान खिडकी मधून अंधुक लाईट प्रकाश येत होता आणि त्या प्रकाशात एक सावली डोलत होती. मी पायऱ्यावर स्तब्ध झालो आणि सुन्या म्हणून हाक मारली पण काहीच उत्तर नाही दोन तीन वेळेस हाक मारली तेंव्हा कुठे सावली हलली आणि सुनील जावळे समोर हसत हसत म्हणाला कशी मजा झाली. मी आलेल्या प्रचंड दडपण मधून कसेबसे हसलो. खरे सांगतो जेंव्हा आपला मेंदूचा सेंट्रल कंट्रोल सुटतो तेंव्हा पॅनिक स्टेट मध्ये प्रत्येक सिस्टम वेगळं कार्य करते, भिती निर्जीव वस्तू मुळे नसते पण अचानक होणाऱ्या हालचाली नक्कीच ठोका चुकवतात.

शेवट: पैजेचा सिनेमा बघण्याची अजून वाट बघत आहे.





डॉ.अरूण थोरात

यादगार सफर.. कॉलेज दिनोका...

यादगार सफर..कॉलेज दिनोका...

उस मोड से शुरु करें, फिर ये जिंदगी..

हरशय जहाँ, हसीन थी, हम तुम थे अजनबी सुदर्शन फ़ाकीर

कॉलेजचे दिवस म्हणजे, आयुष्याच्या पुस्तकातील सर्वात सुंदर आणी रंगीन पान. शाळेच्या शिस्तीच्या चौकटीतून बाहेर पडल्यावर, कॉलेजमध्ये मिळणारे स्वातंत्र म्हणजे जणू पिंजऱ्यातून सुटलेल्या पक्षाला आकाश मिळाल्यासारखेच. कठोर परिश्रम करून करिअरसाठी कॉलेजमध्ये प्रवेश घेतला असला तरी, कॉलेजमध्ये घडणाऱ्या गमती जमती अभ्यासापेक्षा कितीतरी जास्त आठवणीत राहतात, हे मात्र नक्की..

१९८३ उजाडलं.. .12 वी चे टेन्शन, परीक्षा आणी कालांतराने निकाल,..हुश्श ss..आणी एकदाचा निकाल लागला, अगदी मनाप्रमाणे ..मेडिकलला जाणार हे निश्चित झालं..घरात आनंदी आनंद ..उत्साह ओसंडून वाह् लागला, सगळकाही नवंनवीन..त्यात पावसाळ्याचे दिवस..वेगळच वातावरण..स्वारी हवेतच, अगदी वेगळ्या विश्वात गेल्यासारखं.ठरलेल्या दिवशी Interview ला आवश्यक कागदपत्रे घेऊन, मेडिकल कॉलेज ऍडोटोरियमच्या बाहेर दरवाजा उघडण्या अगोदरच हजर,..सोबतीला वडील आणी मोठा भाऊ..सगळीकडे अनोळखी चेहरे, गडबड, कुतूहल ..हॉलमध्ये गर्दीच गर्दी..नंबरप्रमाणे प्रत्येकाची कागदपत्रांची तपासणी.. खूपच भारी वाटत होते.नंतर, एकदाची list लागली .खूपच आनंद झाला, कारण औरंगाबादच्या लिस्टमध्ये नावं झळकले होते..दुधात साखर..

सुरवातीलाच, Anatomy हॉल मधील dissection table allocate केले गेले..T नावाप्रमाणे last but one टेबलं वाटयाला आला.. सुरवातीला, लाईन मध्ये एका मागे एक.. Anatomy हॉलमध्ये entry..साधारणतः २० - २५ tables लावलेले, प्रत्येक टेबलंवर एक डेडबॉडी ठेवलेली आणी हॉलमध्ये फॉर्मॅलिनचा उग्र वास,.. आयुष्यात पहील्यांदाच उघड्या dead-bodies एवढं जवळून बघत होतो,..विश्वास बसत नव्हता, एकदम भयभीत वातावरण, वाटलं कुठे आलोय आपण, जीव घुसमटला, डोळ्यात चूर चूर, मळमळ..कधी एकदा बाहेर पडतोय असे झाले, त्यात फारसे ओळखीचे कुणी नाही .....सर्वांना नावाप्रमाणे tables allocate करण्यात आल्यामुळे, एकमेव थोडयाफार ओळखीचा सुधीर कांबळे (पोहरेगांवकर), तोही नावानुसार दुसऱ्याच टेबलवर फेकला गेल्यामुळे, आणखीनच पंचायत झाली .. माझ्या टेबलंवर सगळेच अनोळखी चेहरे दिसू लागले, पण नंतर लक्षात आले की, आमच्या टेबलंवर "T" नांवकरी असलेले वेगवेगळ्या जिल्ह्यातील सहाजण एकत्र आलेले आहेत उन्मेष टाकळकर, अजय तंम्मेवार राजेंद्र तुंगेनवार, भास्कर तेंगसे, अनिल वरे, आणी, मी स्वतः.. अरुण थोरात..सकाळी कॉलेज सुरळीत चालू झाले, दुपारी LCD, practical आणी dissection..

मग, भेटूयात लवकरच हॉस्टेलला चा अर्थ कळू लागला..आणी सुरु झाले दररोज वेगवेगळे कार्यक्रम, कधी सिनियरच्या बुटाची पॉलिश करने, कधी बळजबरीने तासंतास कोंबडा करायला लावणे, कधी रस्त्याने जाणाऱ्या अनोळखी बाईला गुलाबाचे फुले देऊन i love you म्हणणे, कधी पँटीच्या खिशात हात घालून बोटे मोजायला लावणे, शर्टवर बनियन घालणे, तर कधी हॉस्टेलवर सगळ्यांना एकत्र करून एकमेकांचे मागून शर्ट पकडून आगीणगाडी करायला लावून..कुक..ss.. कुक.. ss आवाज

करत ग्रॉऊंड वर गोल गोल चक्कर मारायला लावणे, अशा गमतीदार गोष्टी घडत असे..

एके दिवशी हिम्मत करून भावाच्या मित्राला भेटण्यासाठी हॉस्टेलला भीत भितच गेलो..तो पहिल्या मजल्यावर जिन्या जवळच्या रूममध्ये रहात असे..बाजूलाच तिन विंग असल्यामुळे, मला झाले confusion, रूम काही सापडेना, एखाद्याला विचारावं म्हणून, बाजूच्या एका रूमला टकटक केल,..आतून त्रासलेला आवाज आला..कोण, काय पाहिजे..? मी म्हणालो मेडिकल स्टुडन्ट आहे, रसाळ कुठे राहतात ? थोड्या वेळाने, आरामात दरवाजा उघडला गेला,..पट्ठ्या टॉवेलवरच, एकदम उघडा बंब, ..मला खालीवर बघितले, अंगात एप्रण व हातात एक वही..डोकं खाजवत, म्हणाला हम्म्म्म..,बरा आलाय बकरा आपणहून चालत..,अरे आत ये ना, रसाळ माझा खूप चांगला मित्र आहे, बाजूलाच राहतो.. बोलावतो त्याला.. तू आधी आत तर ये..वाटले काय भला माणूस आहे यार, कॉटवर बैस म्हणेल, पाणी पिण्यासाठी देईल..पण कसचे काय,.. रूममध्ये गेल्या गेल्याच त्याने आतून दरवाजा लावला.. आणी आपला रुद्रावतार दाखवायला सुरुवात केली .. म्हणाला, चल.. ss.. ठेव ते दप्तर बाजूला तिकडं आणी पहले माझ्या बुटाची पॉलिश कर, चांगले चमकले पाहिजेत, चेहरा दिसायला पाहिजे त्यामध्ये, आणी नंतर त्या कोपऱ्यात जाऊन कोंबडा कर.. मी सांगेपर्यंत उठायचं नाही..आत्ता, म्हटलं कुठंss.. येऊन फसलो, अगोदरचाही दांडगा अनुभव होताच ..

आता, दुसऱ्यांचे बघून आपणही एखाद पुस्तक लायब्ररीमधून घ्यावं..असे वाटू लागले, सुरवातीला Anatomy चे Cunningham,s घेतल्याचे आठवते, वाटलं बस झाल एखाद छोटंसंच पुस्तकं..लाजेकाजे का होईना, जवळ असलेलं बरं..वाचायचे तेंव्हा वाचू .. नियमितपणे कॉलेजला जाणे येणे सुरु झाले..,पण शिकवलेलं सगळं डोक्यावरून जाऊ लागलं.. मेडिकल terminology चा घोळ, dictionary ..त्यात पुस्तकांची allergy..गोंधळ होऊ लागला.. ताळमेळ लागेना, काय करावं कळेना..सगळाच झांघडगुत्ता..

अशातच काही मुलांनी सांगितले, कशाला आलास रे बाबा उगी आताच हॉस्टेलमध्ये रहायला, अरे, इथे रात्री एक हडळ निघतेय गच्चीवर., एक दोघांना मध्यरात्री दिसलीय म्हणे, साक्षीदारही तयारच वर्णन करायला .. आँ ss.. हिरवी साडी नेसलेली असते, कपाळावर मोठ कुंकू, हातात चुडा, एका हातात बकेट आणी दुसऱ्या हातात झाडू..कधी कधी मध्यरात्री रूमवर येऊन खट खट पण करते.. अबो..घ्या ss..आता, काय करावं..आली का पंचायत..रात्रीची ..चांगलीच हवा टाईट झाली की.. हे काय, दिवसभर डेडबॉडी सोबत राहायचे आणी रात्रीची ही हडळ.. बापरे..ss..

थोडे स्थिरस्थावर झाल्यावर gathering चे पडघम वाजू लागले.. कॉलेजच्या cultural night मध्ये मला एक डुएट गाणे गाण्याचा योग आला, सोबतीला female voice साठी एक जुनिअर स्टुडन्ट..गाणं..नवीनच..राम तेरी गंगा मैली, मधील ..यारा ss.. हो.. यारा ss..गाणे छान झाले म्हणून उत्साहात, त्या मुलीने मला स्टेजवरच shake hand करण्यासाठी हात पुढे केला, मी पण भीत भितच तिच्या हातात हात घेतला..

असेच एकदा निवांत असतांना दुपारी साहेब कापुरे माझ्याकडे आला.. गप्पा मारता मारता असे ठरले की, आपण एक शर्त लावूयात.. शर्त कोणती लावावी यावर बरीच चर्चा झाली आणी मी प्रस्ताव ठेवला की, सकाळी सकाळी फक्त लुंगीवर कॉलेजमधील शेट्टीच्या कॅन्टीनला जाऊन पाणी पिऊन यायचे. जो कुणी हरेल त्याने रु १००/- रोख व अंजली टॉकीजमध्ये एक पिक्चर दाखवायचे ठरले. हा.. नाही.. म्हणत एकदाची शर्त ठरली, अटी शर्ती ठरल्या..साहेब कापुरे यानी, सकाळी १ - १.३० वाजता लेक्चर सुटायच्या वेळेस, हॉस्टेल वरून गळ्याभोवती साधूमहाराजांसारखी लुंगी घालून (फिगर ४) कॉलेजमध्ये जायचे व कॅन्टीमध्ये जाऊन पाणी पिऊन यायचे. तरी बघूया.. पोर्चमधून पुढे गेल्यावर समोरून, बरेच सिनियर्स नास्ताकरून opd च्या दिशेने येतांना दिसताच महाराज मोठ्या खांबा मागे लपत, येणाऱ्याला समोर अचानक असा वेगळाच अवतार पाहून सगळेच अचंबित होऊ लागले, महाराज मात्र प्रत्येक मोठ्या खांबाच्या मागे लपण्याचा निष्फळ प्रयत्न करू लागले . आम्ही डोक्याला हात लावून ह्याच्या डोक्यावर परिणाम झाला आहे, व तो कालपासून वेड्यासारखा वागत आहे, असे सांगत..

महाराजांनी क्षणाचाही विचार न करता मुलींच्या घोळक्यात जाऊन त्या खुर्चीचा ताबा घेतला, सर्व मुली गांगारून गेल्या, तशातच महाराजांनी मागचा पुढचा विचार न करता समोरच्या ताटातील उरलेल्या समोश्यावर फुकटचा डल्ला मारायला सुरुवात केली..

चलो,ss अब, बस हो गया,..अभी, जाने भी दो यारों..लिखते लिखते बहुत दूर तक आ गये..अगर पुरा पेटारा खोल दिया तो फजीयत हो जायेगी.. इसलिये कुछ बातें मुठ्ठीमे बंद रहसेही , भलाई होगी ..

खरंच, कसेना..कॉलेज जीवन म्हणजे "अभ्यासासोबतच, भरपूर मज्जा मस्ती, चढउतार आणी आयुष्यभर आठवणीचा ठेवा" म्हणूनच आयुष्यात कुणी कितीही मोठे झाले असले, तरी कॉलेजच्या दिवसांची आठवण आली की, आपसूकच प्रत्येकाची कळी फुलते आणी चेहऱ्यावर नकळत हस उमलते ..

***



In respect of Teachers



DR.SHEELA VERMA

To be born as a human being is god gift !
Taking birth as a boy/girl is parent's gift !
But to make civilized human being is teacher's gift.
Without your guidance and blessing
I would not have learned the art of practicing medicine.
You taught us Morpho- Anotomy physio.
All that I should say sir,that we have our existence
Due to you & only you



डॉ मंजूषा कुलकर्णी

लेडी सिंघम

आम्ही PG करत असताना pathology सीटला रेसिडेन्सी घोषित झाली, मी अन संध्या दोघी मुलीच पात्र होतो, मुलींनी घेतली तर autopsy ला आपल्याला मदत करावी लागेल, म्हणुन बोर्डवरील सूचना गायब, तुला करायची असेल तर आजच अर्ज कर, पैसे पण जास्त, emergency केल्यामुळे शिकायला पण जास्त मिळेल असं डॉ विजय मुळे यांनी मला येऊन सांगितलं, मी घेतली residency अन ठरवलं, कोणाचीही मदत घ्यायची नाही, पहिल्या night duty ला autopsy ला ND ला घेऊन गेले, नंतर सवय झाली एकटीने mortuary त जायची.

आपण करू शकतो, हिम्मत ठेवायची असं शिकले, आत्मविश्वास वाढला.



मै हुं... डॉन



विजेंद्र इंगळे

नमस्कार मंडळी, आज तुमच्याशी गप्पा मारताना खूप मन भरून आलेल आहे आणि मेडिकल कॉलेजच्या गप्पा मारताना अतिशय आनंद होत आहे आणि जुन्या आठवणींचा उजाळा करताना अक्षरशः अंगावर काटा येत आहे.

आपली ८३ ची बॅच म्हणजे एक सुखद अनुभव एक मनाला नेहमीच हळुवारपणे कुळवारनारे क्षण, आपल्या स्वतःमधील एक तारुण्याची लहर व एक बालिशपणा एक लहानपण जोपासणाऱ्या आठवणी.

बरेच किस्से आहेत आपल्या मेडिकल कॉलेजचे आणि हॉस्टेलचे ते तुमच्याशी शेअर करताना खूपच मजा येत आहे,

१) किस्सा कॅन्टीनचा-

आपल्या कॉलेज बिल्डिंग मधील कॅन्टीन च्या परिसरामध्ये नेहमीच वर्दळ असायची, कुणाला जर भेटायचं असेल तर कॉरिडर मध्ये जर नाही भेटले तर कॅन्टीनमध्ये हमखास भेट व्हायची.

या शेट्टीच्या कॅन्टीन मध्ये बरेच पदार्थ नाश्ता जेवण वगैरे नेहमीच असायचे, व दिवसेंदिवस आलू वडे आणि समस्यांची साईज थोडी कमी व्हायला लागली आणि भाव वाढ झाली.

तर मग काय बॉईज हॉस्टेलमध्ये रात्रीच्या गप्पा मारताना आपल्या बॅच च्या मुलांची बैठक झाली व शेट्टीला जागे करण्याचे ठरले- दुसऱ्या दिवशी ठरल्या वेळेनुसार आम्ही पंधरा-वीस मुले शेट्टीच्या कॅन्टीन मध्ये गेलो आणि त्याला सांगितलं की

हम तुम्हारी कॅन्टीन आज लुटने वाले है क्यू कि तुम बहुत दाम बडा दिये है और वडे और समोसे की साइज बी छोटी कर दी है, हे ऐकून तो बाजूला झाला आणि आमच्यातील दोन-तीन जण एकदम पुढे होऊन सगळे समोसे वडे बिस्कीटचे पुढे असे बाहेर काढले आणि कट्ट्यावर ठेवले आणि त्यानंतर मग समोसे वडे व बिस्कीटचे पाकडे सगळे हवेत तरंगत असताना दिसले आणि सगळीकडे फेकण्यात आले आणि जिथे जिथे आपली मुलं होती त्यांच्या हातात जे जे भेटले त्यांनी सगळे खिशात टाकले कोणी शर्ट इन केले आणि शर्ट यांच्या आत मध्ये टाकले शर्ट मध्ये आणि असे करून पंधरा-वीस मिनिटांमध्ये जेवढे त्याच्यासमोर ठेवलेलं सामान होतं जेवणाचं ते सगळं जे घेऊन जाता येईल ते सर्व घेतले आणि आम्ही सगळे ओरडत विजयाच्या अविर्भावात बॉयस होस्टेलला परत गेलो .

त्या दिवशी आणि रात्री सर्वांच्या रूममध्ये शेट्टीचे कॅन्टीनचे पदार्थांची भर पडली आणि सगळ्यांनी मजा केली.

दुसऱ्या दिवशी मात्र शेट्टीने वरे सरांकडे कंप्लेंट केली व सर्वांना बोलवण्यात आले व सरांनी सांगितले की भाई क्या करते हो तुम, तर काही जणांनी त्यांना सांगितले की शेट्टी भाव बडा रहा है, साईझ भी कम कर दिया है इसलिये उसको सबक सिखाना था तोव किया.

वरे सर नी मग मोठ्या मनाने आणि त्यांचे नेहमीच्या पद्धतीने मुलांना समजावलं आणि शेट्टी ला सांगितलं ठीक आहे बच्चे है होते रहता है, तुम जा सकते हो असे म्हणून त्याला पाठवून दिले आणि आम्हाला सुद्धा जायला संगीतलेय आणि म्हणाले ऐसा कुछ मत करना आगे, असे म्हणून वाटेला लावले.

२) भीमसेन जोशी आणि महात्मा गांधी ऑडिटोरियम चा किस्सा :-

एकदा आपल्याकडील महात्मा गांधी ऑडिटोरियम मध्ये भीमसेन जोशी यांचा शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम अरेंज करण्यात आला होता, पण त्यासाठी तिकीट लावण्यात आले होते.

आता एवढ्या मोठ्या कलाकारांचा कार्यक्रम आपल्या येथे होत आहे आपल्याच ऑडिटरमध्ये व आपल्यालाच तिकीट लावून तिथे जावं लागेल हे काय ८३ बॅचच्या मुलांना आवडलं नाही म्हणजे आमच्या दोन-तीन

जणांना आवडलं नाही. मग काय याला काही करून भेदण्याचा चंग आम्ही बांधला.

यामध्ये नेहमीचे यशस्वी कलाकार आम्ही होतो – त्यामध्ये विक्रम हळीकर,आणि मी स्वतः (इंगळे) – आणि तुम्हाला आश्चर्य वाटेल यामध्ये आमच्या सोबत आपल्या बॅचचा सर्वांना सुपरिचित असा प्रसन्ना मिश्री कोटकर सुद्धा होता (हे आश्चर्य नाही का?)

हा प्रसंग म्हणजे एक तारे वरची कसरत म्हणा किंवा रूफ टॉप ची कसरत म्हणता येईल असा हा प्रकार होता– आपल्या ऑडिटोरिअम ची यांचा रचना सगळ्यांना माहीतच आहे त्याप्रमाणे वर बाल्कनीच्या तिथून एक वर जाण्यासाठी एक रस्ता आहे , वर जाण्यासाठी फॉल्स रूफ कडे किंवा सिलिंगच्या आणि रूफ च्या मध्ये .

शो सुरु झाला व आम्ही तिघे चौघे हळूच क्रावलं करत त्या फालस सीलिंग आणि रूफ मध्ये जे बार्स असतात त्या बार वर रांगत रांगत गेलो, आम्ही अशा ठिकाणी पोचलो जिथून आम्हाला पूर्ण स्टेज समोर दिसत होते आणि परफॉर्मन्स भीमसेन जोशी यांचा जो चालू होता तो आम्हाला बघता येत होता .

सर्वात मोठी गंमत तर इथेच झाली – आपला लंबू प्रसन्ना याचा पाय थोडा सटकला आणि एक फालस सीलिंग ची सेटिंग किंवा एक स्लॅब सटकला , काहीतरी जोरात आवाज आला आणि खाली सुद्धा ऑडिटोरिअम मध्ये एकदम काय झालं म्हणून वर बघत होते आणि आम्ही सडनली हे झाल्यामुळे एकदम गांगरून गेलो आणि लपलो.

लकीली कोणालाही काय झालं कळलं नाही आणि आम्ही तो प्रोग्राम तिथेच बसून बघितला व एंड ला तिथून हळूच सटकलो आणि आल्या त्या मार्गाने खाली उतरलो व होस्टेलला जाऊन पोचलो .

अशा तऱ्हेने या थरारक प्रसंगातून आम्ही सगळेजण सुखरूप परत आलो वाचलो म्हणा आणि सुदैवाने ऑडिटोरियम मध्ये सुद्धा काही कुणाला इजा झाली नाही.

असा हा प्रसंग तुमच्याशी शेअर करताना सुद्धा अंगावर एक शहरा येत आहे,

आज हा प्रसंग तुमच्याशी शेअर करतो आणि तुम्ही सुद्धा हा प्रसंग डोळ्यासमोर आणण्याचा प्रयत्न करा व या आमच्या थरारचा अनुभव आता घ्या .

३) फर्स्ट एमबीबीएसच्या कॉलेज गॅदरींगचा किस्सा, क्रिकेट, नाटक व त्यानंतर धमाल मीटिंग्स:-

आपली ८३ बॅच म्हणजे लाईव्ह वायर बॅच , सर्वजण जॉईन झाले एकमेकांच्या ओळखी झाल्या गाठीभेटी झाल्या मित्रपरिवार छोटे अकॅडमी स्पोर्ट्स कल्चरल नाटक असे वेगवेगळे स्मॉल ग्रुप्स पण झाले.

मग आला तो कॉलेज गॅदरींगचा टाईम– जशी सगळ्यांना माहित आहे आपल्या इथे मेडिकल कॉलेजला गणपतीच्या दहा दिवसांमध्ये कॉलेज गॅदरींग करण्याचा पायंडा होता.

मेडिकल कॉलेजची अन्युअल गॅदरिंग ची तयारी सुरू झाली आणि जशी आपली बॅच एक सुपर डुपर टॅलेंटेड बॅच असल्यामुळे सगळ्याच फील्डमध्ये आपल्या बॅचचा म्हणजे ८३ बॅचचा दब दबा सुरू झाला –

* क्रिकेटचा प्रसंग– ८३ बॅच क्रिकेट टीम म्हणजे सुपर टॅलेंटेड आणि पूर्ण कॉलेजमध्ये हवा असणारी टीम होती–

या क्रिकेट टूर्नामेंट मधला एक मजेदार किस्सा तुमच्याशी शेअर करतो – आपल्या बॅचची थर्ड एमबीबीएसच्या बॅच सोबत क्रिकेटची मॅच लागली– आपली पहिली बॅटिंग झाली खूप सारी आपण रन बनवले व त्यानंतर जेव्हा त्यांची बॅटिंग आली तेव्हा आपण सगळ्या मुलांनी सांगितलं की ठीके तुम्ही जिंकले तुम्ही जा आता ,तर ते भांडायला लागले तेव्हा रे तुमची बॅटिंग झाली आम्हाला बॅटिंग पाहिजे –

तुम्हाला सांगितलं ना तुम्ही जिंकला जा आता –तर ते मानायलाच तयार नव्हते त्यांना वाटलं की आता आपल्याला बॅटिंग पाहिजे फक्त कारण त्यांना आपल्या साध्या भाषेत त्यांनी आपल्याला २५ ओवर्स फील्डिंग करायला लावली आता म्हणतात तुम्ही जिंकलं हे चालणार नाही अशा तऱ्हेने थोडासा वाद झाला मग नंतर आम्ही खेळलो आणि ऑबविअसली ही मॅच जिंकलो.

या टूर्नामेंट मध्ये ८३ बॅचचा धमाल परफॉर्मन्स झाला होता व अजिंक्यपद सुद्धा मिळवले.

आपल्या बॅचचे वैशिष्ट्य म्हणजे आपल्या मेडिकल कॉलेजच्या टीम मध्ये आपल्या बॅचचे सहा खेळाडू होते– अनिल वरे, संजय राख, नीरज दुबे, मनोज कसलीवाल , सयाजी सोळंके व मी विजेंद्र इंगळे

आज हे सांगताना आनंद होत आहे की, डॉन हे नाव मला याच मेळाव्याच्या वेळी देण्यात आले होते, जे माझ्यासोबत कायमचे राहिले.

या क्रिकेट टूर्नामेंट मध्ये एक आवर्जून आठवण सांगावीशी वाटते ती ही म्हणजे आपल्या सोबत आपला सयाजी साळुंके हा विकेटकीपर बॅट्समन होता आणि त्याने खूप चपळाईने विकेट कीपिंग केली होती व बॅटिंग सुद्धा खूप छान करायचा व केली होती त्यावेळेस. दुर्दैवाने तो आज आपल्या सोबत नाही त्यासाठी आपल्या सर्व टीम मेंबर्स तर्फे व आपल्या ८३ बॅच तर्फे मी सयाजी याला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो – लव्ह यु अँड मिस यु सयाजी.

नाटक व त्यानंतर धमाल मीटिंग :-

मेडिकल कॉलेजच्या इतिहासामध्ये असे केव्हाच घडले नाही ज्यावेळेस पहिल्याच वर्षीच्या बॅचने एकाच गॅदरिंग मध्ये तीन एकांकिका नाटक प्रस्तुत केल्या .

मला अत्यंत आनंद होत आहे हे सांगताना की ''सौजन्याची ऐशी तैशी'' या नाटकांमध्ये मी नानाच्या एका भूमिकेत होतो , त्याचा एक फोटो आपल्याकडे आहे तो इथे शेअर करत आहोत.

कॉलेज गॅदरींग संपल्यानंतर सुद्धा ८३ बॅच ची खासियत होती सर्व भेटत राहिलो आणि जे औरंगाबादला स्थायिक बॅचमेंट होते त्यांच्या घरी जाऊन पार्टी म्हणजेच जेवणाचा कार्यक्रम ठेवला आणि त्यामध्ये सर्वांच्या आई वडिलांशी भावंडांशी पण भेटीगाठी झाल्या आणि हा एक सुखद अनुभव आजपर्यंत मनाशी दाटून ठेवलेला आहे.

लव्ह यु ऑल ८३ बॅचमेटस .

विथ लॉट्स ऑफ लव्ह अँड गुड विशेस,

**



Gori hai kalaaiya …
And the thrill follows



डॉ.जयश्री भाले

One incident from my postgraduate days remains etched in my memory. It was a day when I encountered college politics for the very first time.

Those were the days of college gathering.

It was fun , music and masti everywhere. As usual our classmates were in full swing to perform. Everybody was enjoying. But suddenly ye sabko kisi ki nazar lag gayi.

It began innocently enough. Anu was singing Gori hai kalaaiya in the auditorium, and she had completely hypnotised the audience. Everyone was listening intently, followed by enthusiastic applause. Suddenly, there was shouting and commotion in the auditorium. We had no idea what was happening or what had triggered it.

We decided to go back to the hostel to change our clothes. There were only two of us in the hostel at that time. We had barely settled in when a sudden mob entered the hostel. They were looking for Someone from our class.

We immediately locked ourselves inside a room. The atmosphere was frightening. We could sense the danger even before we fully understood what was happening. After some time, when things seemed slightly quieter, we cautiously came out. I moved to another room and locked myself in again.

I was completely alone in the hostel, with my heart in my throat. There was a huge hangama downstairs. The shouting continued, and the entire campus seemed to be in turmoil.

Then the police entered the campus.

I saw them through the hostel window and desperately waved at them. Fortunately, they noticed me and came towards the hostel. At that moment, I took a chance and ran back towards the auditorium. Somehow, it felt like the safest place to be.

That day was the first time I was truly exposed to politics. Until then, politics had been something distant—something we heard about but did not really experience. That day changed my perspective.

I realised that life outside the protected world of academics could be very different. There would be situations we could neither predict nor control, and there would be unpleasant realities that we would have to face with courage.

It was a frightening experience, but also an important lesson. Looking back, I realise that it was one of those moments in life that quietly teaches you that growing up is not just about acquiring knowledge—it is also about learning to navigate the realities of the world.

****





डॉ.संजय पतंगे

हुडुत !!!

हे काय उत्तर झालं.

एक बिचारा लग्नाळू मुलगा तुमचे सौंदर्य आणि संस्कार यावर भाळून लग्नाविषयी विचारतोय आणि तुम्ही फटकन हुडुत म्हणता !

अर्थात ही गोष्ट वेगळी की रात्रीचे २ चा मुहूर्त काही असे प्रणयरम्य प्रस्ताव ठेवण्यासाठी चांगला नसतो. आणि दोन्ही बाजूला वॉर्ड असलेला कॉरिडॉर तर तसे रोमँटिक स्थान पण नसते.

पण तरीही काय झाले. हुडुत !! म्हणणे म्हणजे अती झाले.

अर्थात तुमच्या लक्षात आलेच असेल की असला भोचकपणा फक्त तुमचा मित्र, अस्मादिकच करू शकतो.

ते काय ते म्हणतात ना, दिलके तुकडे हजार हुए, एक इधर गिरा, एक उधर गिरा. असल काहीतरी मनातल्या मनात गुणगुणत खिशात हात घालून चालत चालत जमिनीवर काही तुकडे दिसतात याचा धुंडाळा घेत स्वारी निघाली पुढे हॉस्टेल कडे.

थोड्या वेळानंतर शुभांगी म्हणाली.

माझ्या लग्नाविषयी निर्णय घेण्याचा अधिकार माझ्या वडिलांना आहे. तुम्ही माझ्या घरी संपर्क करू शकता.

हम्म

मी आपला मनातल्या मनात, मला थोडेच हिच्या वडिलांशी लग्न करायचे आहे ! सरळ हो किंवा नाही सांगायचे ना. हो किंवा नाही म्हणून !

तीन महिने गेले असेच.

आणि एकेदिवशी सकाळी सकाळी सात वाजता..

रूमचे दार खाड खाड वाजले.

रूम पार्टनर विजय काळबांडेनें दार उघडले. मी डोळे किलकिले करून पलंगावरूनच पहात होतो.

विजय टॉवेल वर. टॉवेल म्हणजे हॉटेलच्या मुलांचा स्टँडर्ड नाईट ड्रेस. मी पण टॉवेल वरच झोपलो होतो.

दरवाज्या पासून विजय घाईघाईने वापस फिरला.

बॉस, उठो. डोके मॅडम आई है. आपको मिलने के लिये.

पटकन पँट शर्ट चढविला आणि डोळे चोळत दारापाशी गेलो.

सकाळी सकाळी काय काम असेल?

दुसऱ्या वेळेस हुडुत म्हणायला आली की काय ही बया? होत नाही समाधान काही लोकांचं. किंवा ते तलाक, तलाक, तलाक तीन वेळेस म्हणावे लागते तसं हुडूत हुडूत हुडूत अस तीन वेळेस म्हणायची पद्धत आहे की काय अंबेजोगाईला? पहिलं हुडूत रात्री दोन वाजता, एकट्यात. आता दुसर हुडूत सकाळी ७ वाजता रूम पार्टनर च्या साक्षीने ! आणि तिसर हुडूत नक्कीच दुपारी व जाहीर सभेत होणार! असले काही बाही भीतीदायक विचार मनात ठेवत, पोटात उठलेला गोळा महत्प्रयासाने दाबत आम्ही दरवाजापाशी गेलो.

तुम्हाला माझ्या सोबत लग्न करायचेय ना? मग तो माझ्या रूमवर मला बघण्यासाठी एक मुलगा आलेला आहे. त्याला हाकला अगोदर !

काय?

ये मैं क्या सुन रहा हूं?

अच्छा है मेरे कान और आँखें साबुत है!

नाही. मी अस काही चिरकलो नाही.

छाती धडधड करीत होती. तो पर्यंत विजय कपडे घालून तयार झाला होता.

दोन मिनिटे आत या आणि थोडक्यात सांगा.

शुभांगी मधे आली.

सार अस होत की तिला पहायला नागपूरचा एक ऑफ्थलमॉलॉजी डिपार्टमेंटचा सी आर येणार होता. पुण्याला तिच्या घरी.

दोन्ही घरच्यांनी मिळून तारीख ठरविली होती. शुभांगीला पत्र घरून आले होते. तिने त्याच दिवशी तिचे सेमिनार प्रेझेंटेशन आहे त्यामुळे येऊ शकत नाही असे पत्र पाठवून दिले होते. तो निरोप पाहुण्यांना देण्यात पण आला होता.

आणि तरीही पठ्ठ्या सरळ हॉस्टेल वर आला होता. नागपूर वरून ! कुठलीही पूर्व सूचना न देता.

सारे चित्र स्पष्ट झाले.

खात्री झाली होती तरीही पुन्हा खुंटा हलवून बळकट करावी म्हणून बोललो,

मी त्याची व्यवस्था करतो. पण मग आपण लग्न करणार का?

हो.

वडिलांच्या परवानगीचे काय?

देतील ते. मी हट्ट धरेल.

आणि नाही म्हणाले तर?

मग आपण तरीही लग्न करू या.

अगा विश्विविजय जाहला की !

चला, मी येतोच फ्रेश होऊन. सारे जन चहा कॅन्टीनमध्ये घेऊ या.

वर तिच्या रूम मध्ये गेलो.

ओळखी करून देण्यात आल्या.

मी कॅन्टीनमध्ये नाष्टा करण्याचे निमंत्रण दिले. निघाली वरात कॅन्टीनला. मी, शुभांगी, तो लग्नाळू आणि सोबत त्याचा एक मित्र. नाष्टा, चहा झाला सर्वांचा.

आणि मी सुरु झालो.

कस काय आलात? अचानक ? सूचना न देता?

सांगून आलो असतो तर खऱ्या गोष्टी कळल्या नसत्या. आम्ही सकाळी सहालाच उतरलो. अगोदर हिच्या डिपार्टमेंटला जाऊन टाइमटेबल पाहिला. त्या दिवशी हिचा कुठलाही सेमिनार नव्हता. शेवटी जिच्या सोबत लग्न करायचे म्हणजे तिची वागणूक, शील, संस्कार पहावे लागतील ना!

दोन्ही हाथ टेबल वर ठेवून मी खाडकन उठलो.

पुढे झुकून हळुवार आवाजात बोललो.

मारीच्या, तू माझ्या बायकोचे शील पाहणार का?

दोघांच्याही तोंडाचा आ काही मिटेना !

अहो, पण तुम्ही दोघांनी तुमच्या घरच्यांना सांगायला पाहिजे होते ना!

घरच्यांना काय सांगायचे ते आमचे आम्ही पाहून घेऊत. पण मुलगी येत नाही हे कळल्यावर सुद्धा जो इथपर्यंत येतो त्याची अक्कल कळली आम्हाला. त्यामुळे मी काय सांगतो ते नीट ऐक. एक सेकंड सुद्धा न दवडता सरळ रिक्षात बसायचे आणि बस स्टँड पर्यंत शाबूत पोहोचायचे. किंवा पंधरा मिनिटाच्या वर इथे थांबा तुमच्या दोघांचेही हात पाय तोडून पाठीवर बांधून पार्सल करण्याची व्यवस्था मी करेल!

अहो पण..

चल उठ त्याच्या मित्राने त्याला हाताला धरून खेचत नेले.

हुडूत पासून सज्जड होकार कसा झाला याचा मला पडलेला प्रश्न शुभांगीने मधल्या तीन महिन्यात काय काय घडले ते सांगून नंतर सोडविला.

आणि तुम्हाला सुद्धा हे माहिती असणे आवश्यक आहे.

मित्र म्हणजे सुखी माणसाचे सदरे.

राजाची आणि सुखी माणसाच्या सदऱ्याची गोष्ट माहिती असेलच.

त्या राजापेक्षा मी खूप जास्त सुखी आहे. नशिबवान आहे. कारण माझ्याकडे खूप मित्र आहेत.

आमच्या पहिल्या रात्री २ वाजताच्या रोमँटिक भेटीनंतर मी शुभांगी डोके हा विषय डोक्यातून काढून टाकला होता.

पण शुभांगीच्या डोक्यातून काही हा विषय गेला नाही. तिच्या मैत्रिणींनी जावू दिला नाही.

हुडूत किस्सा झाल्यावर दुसऱ्याच दिवशी तिने आपल्या जवळच्या मैत्रिणींना हा किस्सा सांगितला. रूममेट होती स्नेहा मसलेकर आणि फास्ट फ्रेंड होती मंजू चौधरी.

अगोदरच अंबेजोगाई मधे मी डॉक्टरांच्या (मार्डच्या) आजपर्यंतच्या सर्वात प्रदीर्घ काळ चाललेल्या संपामुळे प्रसिद्ध होतो. त्यात मसलगेकर संभाजीनगर मधे आपली सिनिअर. मला चांगली ओळखणारी. तर मंजू चौधरी परभणीची. एक वर्ष हिंगोलीला राहिलेली.

तुम्हाला माहिती असेलच की मी स्वतः च्या दिसण्याच्या बाबतीत, टापटिपीच्या कधीच गंभीर नव्हतो. दाढी चार दिवसातून एकदा, बुटाला पॉलिश मनात आले तेंव्हा, कपड्याला इस्त्री मुहूर्ताला इ. इ.

पहिल्यांदा जेंव्हा शुभांगीने हा किस्सा सांगितला तेंव्हा, बाई ग किती नशीबवान तू. नाही म्हणालीस त्याला अगबाई. वेडी आहेस की काय.

नंतर दिवसातून दहादा सुरू झाले.

बघ, चेहरा किती सुकलेला दिसतोय त्याचा !

बघ प्रेमभंग झालेला मुलगा कसा दिसतो ते. दाढी सुद्धा वाढवून ठेवली. एक ना दोन.

अरेरे! बिच्चारा !

ज्या दिवशी मी दाढी केली की, आज दाढी केलेली दिसतेय. तू काय हसून बघितले होते की काय काल त्याच्याकडे !

तीन महिने माझा विषय एवढा खोल रुजवला त्यांनी की शुभांगीला जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी मीच दिसू लागलो. ती वाट पाहू लागली की मी आता तिच्या घरी संपर्क करेल, नंतर करेल. माझ्या कडून काहीच हालचाल नाही!

आणि मग हा शहाणा पोहोचला सकाळी सकाळी. कडेलोट झाला. म्हणून मग तिने पटकन निर्णय घेतला आणि धडकली सकाळी.

क्रांती रायमानेला त्रिवार सलाम.

मला एम एस भेटल त्याला कारणीभूत असणाऱ्या काही महत्वाच्या लोकांपैकी ७० टक्के वाटा क्रांती आणि मिलिंद पोहरे यांचा ! मी बापडा दूर, संभाजीनगर मधे बसलो होतो पण असामान्य बुद्धी चातुर्याची, ज्वलंत मित्र प्रेमाची ही कथा नंतर कधीतरी.

शुभांगीने घरी कळविले. स्वतः जाऊन पण आली. त्या सकाळी तिला रिसिव्ह करायला मी बस स्टँड वर गेलो आम्ही दोघांनी हॉटेल रीगल वर चहा घेतला आणि एकाच रिक्षात बसून आलो. अकरा वाजता आमच आख्ख डिपार्टमेंट चहा पीत असताना सुरुवातीला शोभा काकानी आणि नंतर एक एक जण येऊन आमचे लग्न ठरल्याबद्दल माझे अभिनंदन करू लागले.

शुभांगीच्या घरच्यांनी माझ्याविषयी चौकशी सुरू केली. कुणाकडे? क्रांती कडे !

मी एवढा प्रचंड सद्गुणी आहे हे मला तेंव्हा कळाले. मला त्याअगोदर माझ्याकडे सद्गुणांची एवढी मोठी खाण आहे याची कल्पनाच नव्हती!

आणि क्रांतीच्या प्रशस्ती पत्रानंतर तिच्या घरच्यांकडून रुकार आला.

म्हणजे क्रांती मुळे मला पदवी पण भेटली आणि पत्नी पण.

माझ्यासारखा नशीबवान मीच अस मी नेहमीच म्हणत आलो. ते याच कारणामुळे.

माझे आयुष्य अकल्पनीय घटनांनी भरलेले आहे. आणि बहुतेक चमत्कारांमध्ये मित्रांचा हात आहे. मागे वळून पाहतांना आयुष्य म्हणजे एक मधुर स्वप्न वाटते आणि मित्र कल्पवृक्ष.

**



Echoes of the Wards and Bappa's Grace



Dr Jyoti Purwar

Medical college days we all remember with nostalgia—. We were young, wide-eyed, and trying our best to step into the demanding shoes of healers. Those formative years at Government Medical College, Aurangabad, quietly shaped our core: instilling honesty, devotion to our patients, sincerity in duty, and an enduring faith in the healing energies of the universe. Values that were deeply ingrained during those corridors remain with me to this day.

Looking back, one particular memory from our clinical postings stands out with vivid clarity.

Our clinical unit of 15 eager students was posted in the Department of Medicine. We arrived on day one with stethoscopes in hand and hearts full of anticipation, looking forward to bedside clinics and learning the art of diagnosis. But day after day, our expectations were met with quiet waiting. For some reason still unknown to me, no senior had begun our bedside teaching sessions.

We watched other batches examine patients, discuss and share about new experiences, while our unit waited patiently in the ward until the hours ran out. At the end of each day, our deflated group would gather under the shade of a tree, pondering what to do next.

Desperate to learn and out of practical ideas, we decided to take our collective grievance to almighty, so one day we marched to Varad Ganesh temple-(actually I had forgotten the name of temple & had to ask my brother about it)

''आम्ही देवाच्या दारी गेलो आणि देवासमोर नारळ फोडला. म्हणालोबाप्पा, तूच आमचा रखवाला, कर काही तरी!''

It was the innocent prayer of frustrated young students whose only wish was to be taught medicine.

Perhaps Bappa truly heard that pure plea and smiled upon us. Not only did our clinical postings eventually fall into place, but in a wonderful twist of fate, many students from that exact batch went on to pursue their MD in Medicine. To this day, I believe in my heart that it was nothing short of Bappa's kripa guiding our paths.

As we reunite this October to relive old stories, I wonder—how many of our batch mates still remember that day and the coconut we offered at Bappa's feet?

I will miss our GT but there is always next time. Three cheers to batch 83- in my heart we were the best & shall always remain the best.





डॉ हितेश रायठठा

वो दिन भी क्या दिन थे...

Vijay Sikchi phoned me last month, the phone rang at 12:20 AM. Not a WhatsApp message. Not a ''क्या हाल है हितेश?'' Text. An actual phone call. For a split second, my pulse quickened the way it still does even after thirty-five years of practice. In our sixties now, late-night calls from the 83 batch usually mean someone's patient has crashed, a family member is serious, or worse — one of our own is in the ICU.

But it was only for Preparation of Get-Together.He was driving back home and found I was active on Whatsup message , so without formality he phoned me. (By the way in the background , probably ? car FM Radio an old Kishore Kumar song मेरे सपनों की रानी कब आएगी तू

Unmesh used to sing in the GMC Aurangabad hostel). We spoke for nearly forty minutes about Get-Together Preparation & things that would sound ordinary to anyone else. From Modi/ Rahul to Trump , to Difficulty in Practice to Six litre Milk Bag (Laugh , Viju knows the secret)

And yet, when the call ended, I sat on the balcony of my Room for a long time thinking about life with some mixed emotion Not exactly sadness. Just the brief, tender return of the young entered in Medical College.There was a time when friendship needed no planning. We were the 1983 batch at Government Medical College, Aurangabad. We joined together in 1983, survived the brutal first-year dissections, Fear of Shroff Sir & Panse Madam, Open the doors of all the Window of Dr Chimane sir , Same Dress through out the one an half yr by Dr Sayyad sir of Biochemestry, Well calculated legal word Spoken by Dr V L Deshpande (In my presence , under my Guidance & supervision viscera handed over to … , Xray are Shadow , we have to treat the patient not the Shadows by our Orthopadic boss and so many on…..), and finally walked out with our MBBS degrees in 1987.Entire nights disappeared in the hostel canteen or Azmat Tea Stall with endless cups of cutting chai, sharing one plate of अंडा भुर्जी , and discussing rumors , gossip , affairs of College , Bollywood & Sports. We knew whose ward postings made him faint at the sight of blood, who was secretly in love with the girl from the 83 batch(Sanju & Anu is only successful love story of our Batch) , and how all of us failed the anatomy viva when we entered college (Except Unmesh , Swapana & Kabra) We lent each other notes, white coats, Shirt , (Except Underwear) stethoscopes, and even the last fifty rupees before the monthly parental money arrived. Friendship in those MBBS years was gloriously meaningful. We had impossible workloads but still found time — for late-night Maggi in the hostel, for hopeless crushes, for crying after an exam particularly after Viva, and for celebrating each passing professional like it was a war victory.

Somewhere between "yaar, agale mahine milte hai and, OPD

me itani bheed hai, baad me baten karte hai !," that friendship became one of the most painful and least discussed losses of our generation. But the slow fading of the people who once knew you when you were a scared first-year student dissecting your first cadaver? That grief has no name. No one prepares you for the day when your closest dissection partner (Kranti – The Common Man Of R K Laxman) — the one who stayed up with you before the final MBBS exams(Viju & Ganesh Rathod) , who knew which professor you feared most, who celebrated your first intubation case with you (Mradulla & Kauthale) — now only messages on your birthday or forwards health tips in the group (Kauthale is almost passive passenger in whatsup journey) . The person who could read your mood from the way you said " sub thik hai re " , now only post about his clinic or family vacations (Exception is Viju Sikchi , still comes home to meet me in my crisis). Most of 83 batch friendship bond remain intact not only on whatsup group even after settle down at Aurangbad, Jalna, Parbhani, Nanded, Latur,… or Retirement, Transfers, Children's Education & their Marriage, Grand Child's Masti, Parent's illness - life kept pulling us in different directions at different speeds.

One day you realise the person who once knew your every success, failure, insecurity now only like Diwali Family Photo or Doctor's day post.

Modern life teaches us to optimise everything — time, money, even emotions. But true friendship has always been inefficient and imperfect. It asks you to listen to the same story of a difficult patient for the tenth time. It demands you pick up the phone at midnight just because an old song reminded someone of hostel days.

Beneath the grey hair, the joint pains, and the heavy responsibilities of Family & Profession, We still consider our core (Destiny) Friendship important. Keep it this spirit of Friendship till your last Breath. Eagerly Waiting to meet all Destiny Friends of 83 Batch. Take care.

यादों के पुराने अल्बम में छुपा के रखे हैं हमने वो दिन

गुल्लक में पड़ी चवन्नी सी, बचा के रखे हैं हमने वो दिन

ना किसी मंज़िल की फ़िकर थी

ज़िंदगी जीने की उमर थी

दोस्ती और दोस्तों से उधार के दिन थे

वो दिन भी क्या दिन थे!



डॉ.संजय पतंगे

MBBS द्वितीय वर्ष. पहिली क्लिनिकल पोस्टिंग सर्जरीची. केस टेकिंग रोल नंबर नुसार रोटेशन ने असायचे. कुणातरी मुलीचा नंबर होता. पहिलीच क्लिनिकल पोस्टिंग असल्यामुळे उत्साह प्रचंड!

केस होती हायड्रोसिल ची. म्हाताऱ्याचे वय होते जवळपास ७४. ठार बहिरा!

' बाबा हे कधी पासून आहे?'

' आंSSS'

' हे कधी पासून आहे?'

' म्या व्हय, बोरिचा हाय. सिल्लोड तालुक्यात

आता बाकीच्या मैत्रिणी सुद्धा सरसावल्या. तार स्वरात विचारणे सुरू झाले. सोबत हातवाऱ्यांचा आधार!

दोन्ही हात पसरून, तार स्वरात, ' हे कधी पासून आहे? '

बहुधा हातांच्या इशाऱ्या मुळे समजले असावे. म्हाताऱ्याने उत्तर दिले बरोबर.

आता सुरू झाली प्रश्नांची सरबत्ती. हिस्ट्री टेकिंग.

आख्ख्या वॉर्ड आणि आम्ही मुले हसून हसून परेशान!

Important life lesson college taught:

Enjoy the life and it's journey. Cherish friends.



Golden Memories of Hostel Life



Dr.Bhushan Malewar

Hi...all my dear destiny friends of our '83 batch..!

Today I'm trying to pen down some good old memories of our medical college days hotel life.. wish u all will like & will do remember, relate it much.. It started after our 12th results came out & my hopes of getting admission to medical became bright.. At last got the interview call, interview was over successfully getting provisional admission at GMC Aurangabad..!! The dream comes true.. to be a doctor.. first to be in our family then..The day of joining came.. I got my joining telegram 15dys late, didn't know why.. Till then many of our Parbhani boys were joined already.. Of which Kiran Patil, Bhaskar Tengse were in close contact.. As in our 1/1 term we all used to stay out side of medical campus to avoid ragging by seniors & probably no room vacancy at our boys hostel then...

So many boys used to stay in near by Begumpura area.. So I partenered with Kiran & Bhaskar in a single big room which was on first floor of our landlord's house.. That time how much was house rent,I don't remember now.. In the same area.. our other boys Hitesh, Unmesh, Vijay Sikchi were also housed..

We all in group used to go to college lectures in morning many times.. Madhu Menon also used to stay nearby remember.. I think we visited his home once then..

Many times after entering our college building from library end towards Anatomy lecture hall on 1st floor through long corridors on ground floor at other end.. Many seniors used to catch us for ragging.. They used to ask us to wear approns, make a line like a train & whistle.. luckily I was not encountered much with harsh type of ragging then.. Thanks to some known seniors.. Sachin Deshmukh, Ravi Kadasane, etc as we all were sharing in the same wing of new Boys Hostel then.. By near end of 1st term we all get hostel allotments.. Most of our boys got allotment of rooms in New Boys Hostel.. We 3..Kiran, Bhaskar & me decided to stay in one room.. We got Room #14.

Slowly all our destiny friends started knowing each other.. In the same wing Anil Salunkhe, Vijay Patil, Sayaji used to live, on the same floor opposite wing Narayanrao, Don used to stay.. Niraj, Sanjay Rakh partenered together & lodged on the first floor... After some days Baskar shifted himself on first floor room with Sudhakar Bokare...and thus our golden days started.. Slowly our anxious days were gone.. We got adjusted at hostel & college campus life..many of us joined different mess, some chosen hostel mess which was run by Vishvasrao.... hardly anybody knew his sir name then.. His unique anda-bhurji pohe was famous dish & used to like by most of the boys...but for breakfast mostly preferred our college canteen

managed by our loving Shetty..

Many times during our strikes, protests Shetty's canteen was looted by students & poor Sunder Shetty used to watch it quietly counting his Shetty used to watch it quietly counting his losses.. Those days we never bothered such things a bit.. Sundays were evening off for all messes after grand feast for lunch..!! think it's too long description for our E magazine.. 'अक्षरधारा 83 !! It can be a book if we recall our memories... So I'll cut it down in short with some of our unforgettable events, pranks played by some of us at hostel then.. Do anyone remember one famous incident of 'हडळ'... happened at boys hostel..!?? It was in news paper also if anyone remember it..It was nothing but the great prank played by us.. it included myself, Sunil Jawale, Raja Sable, Don.. We used to scare other boys at late midnight.. I used to take Sunil on my shoulders covering all our body with white bedsheet with big stick in hands banging on window glass from outside of hostel areas.. many boys including some of seniors also got scared then.. Digu, Narendra Bidarkar, Sandip Babu, Teky were some of the victims ... This prank was run for almost a month successfully...!!

The other incident I remember was to go to Anatomy dissection hall on 3rd floor in the dark mid night & wave off hands to others standing on ground from there.. & the bet was a beer I guess... & we me & Sachin Zanvar won the bet.. Downstairs waiting team were Anil Vare, Sanjay Rakh, Neeraj, Mama Rathod..!! Another more memorable incident was our Goa tour.. It was very much fun filled & different experience for all of us... There are many such incidents to remember & cherish for lifetime.. Many of us may agree with this & can relate it with their loving hostel days memories... Here now I'll conclude my narration.. Hope u'll like it.. I thank you all our destiny friends 83 from bottom of my heart & beg u pardon if I hurt any of you knowingly or unknowingly...!! Bye.. Bye... hope to c u all in person on Oct 23rd at Pench.. With all respect & love...!!

The Dabbas from Home

One of my most memorable parts of hostel life was sharing our dabbas from home. Every so often, parents would send food from home—sometimes sweets, sometimes snacks, sometimes a special homemade dish. And whenever someone's dabba arrived, especially around a birthday, the news would spread through the hostel like wildfire.

There were about 12 of us hostel girls, and the moment someone heard that a dabba had arrived, everyone would come running. We would open it together, share everything, and before we knew it, the entire dabba would be finished! It was never really someone's food. Once it reached the hostel, it belonged to all of us.

Our hostel family included girls from many different towns: Sushma, Sucheta, Jyoti, Varsha, and me from Latur; Sandhya and another Varsha from Parbhani; Anju from Hingoli; Kalpana and Manju from Nanded; and Mangal from Parli, and Mrudula from Jalna along with all the other wonderful girls who made those years so special.

Looking back, I realize that those dabbas were much more than food. They were little packages of home, love, and comfort sent by our parents—and we turned them into something even bigger by sharing them with one another. Those simple moments of sitting together, eating with our hands, laughing, and making sure nobody missed out are among the memories I treasure most from hostel life.

- Smita gugale





Dr.Manoj Kasliwal

Golden Era

There were few sporting competion during our college days.

We use to play cricket matches on the ground which was in the campus.

There was one scheduled match between our class and third year batch.

Mishri noticed that I was not looking well. He went to the staff nurse and told her that Sudhir was not feeling well. Unfortunately, the response was reassuring rather than alarming—"Don't worry. There will be some pain after an operation."

But my condition was deteriorating rapidly.

After some time, I was probably losing consciousness. Mishri immediately checked my blood pressure. The systolic blood pressure was only around 70 mmHg. I was pale, drowsy and clearly in serious trouble.

Mishri rushed back to the staff sister and insisted, "His blood pressure is dropping. He looks pale and drowsy."

This time, the seriousness of the situation was immediately recognised. The sister called Dr. Bhagwat Sir, who came to examine me. He immediately understood that this was not an ordinary postoperative problem.

I was rushed back to the operation theatre.

Everything happened with extraordinary speed. Four bottles of blood were arranged immediately. Dr. Borgaonkar called for assistance for Dr. Bhagwat. During the emergency re-exploration, a bleeding vessel was found in the abdomen, and there had already been significant blood loss.

What followed was nothing short of a miraculous second surgery.

Fortunately, the bleeding was controlled, the surgery went well, and I survived an episode that could easily have had a very different outcome.

That experience changed me in many ways.

For almost the next six months, I was recovering. Being confined to rest was frustrating. For someone accustomed to being active, having nothing productive to do could become extremely boring.

But perhaps that period of forced inactivity turned out to be one of the most important periods of my life.

I decided to learn something new.

I started exploring computer software and programming. What initially began simply as a way to keep myself occupied soon became a fascination. I discovered that I genuinely enjoyed computers, software and coding.

One thing led to another. I began learning different programming languages and experimenting with software development. I found myself spending hours understanding how computers worked and how software could solve real-world problems.

At that stage, I joined Pathology, but I soon realised that pathology was not where my real interest lay. My mind was increasingly occupied by computers and technology.

Eventually, I took the difficult decision to leave pathology and pursue software full-time.

And then, as they say, the rest is history.

My journey took me far beyond the boundaries of my medical education. I travelled to Mumbai, Hong Kong, Singapore and the United States, working on various software projects.

Interestingly, my medical background never really left me.

Instead, medicine and technology gradually began coming together.

I started working on software projects related to the medical field, where my understanding of medicine helped me look at technology from a completely different perspective. I could understand not only what the software could do, but also what doctors, hospitals and patients actually needed.

Looking back, that unexpected complication during my internship was a turning point.

At the time, I thought I had lost six months of my life because of illness. Today, I look at those six months very differently. If I had not been forced to rest, perhaps I would never have started learning software. If I had not discovered my interest in computers, perhaps I would have continued on a completely different professional path.

One crisis unexpectedly opened a new door.

Medicine taught me to understand the human body.

Technology taught me to understand information.

And today, Artificial Intelligence is bringing these two worlds together.

I am now working in the field of AI for healthcare—an area that I believe has the potential to transform the way healthcare is delivered.

AI can help doctors analyse enormous amounts of medical information, identify patterns, assist in diagnosis, improve clinical decision-making, personalise treatment and make healthcare more accessible. But I also believe that technology should remain a tool in the hands of healthcare professionals—not a replacement for human judgement, compassion and responsibility.

My journey has therefore come almost full circle.

I began as a medical intern, learning how to care for patients.

An unexpected medical emergency changed the course of my life.

During recovery, curiosity introduced me to computers.

Computers took me into the world of software.

Software took me across countries and into healthcare technology.

And today, that journey has brought me to Artificial Intelligence in Healthcare.

Perhaps this is what makes life so fascinating.

We often think that our failures, setbacks and interruptions are taking us away from our destination. Sometimes, they are actually redirecting us towards a destination we could never have imagined.

My story is not simply a journey from Internship to Internet.

It is a journey from Medicine → Technology → Software → Healthcare → Artificial Intelligence.

And perhaps the most important lesson I learnt along the way is this:

Never underestimate an unexpected turn in your life. It may be the beginning of your most exciting journey.

From internship to Internet—and now from Internet to Intelligence.

The journey continues.

***





डॉ.सुषमा देशमुख

माझा हिस्टेरोस्कोपी प्रवास

To view Uterine cavity from inside
Is like visiting The Pious Place
Where every human being spent their early life
With Affection & Love!
We evaluate that place
And Thy Name is Hysteroscopy'

गर्भाशयाची पोकळी आतून पाहणे
म्हणजे त्या पवित्र स्थळाला भेट देण्यासारखे आहे
जिथे प्रत्येक मानवाने आपले सुरुवातीचे आयुष्य
स्नेह आणि प्रेमाने घालवले आहे!
आम्ही त्या जागेचे मूल्यांकन करतो
आणि तुझे नाव आहे हिस्टेरोस्कोपी

कधी कधी आपल्यालाच कळत नाही, आपलं आयुष्य आपल्याला कुठे नेत आहे. पण आपल्या अखंड मेहनतीला, चिकाटीला, सकारात्मक वृत्तीला दैव व देव साथ देतं. आपल्या आयुष्याला एक सुरेख वळणावर आणून सोडतं हे माझ्या बाबतीत अक्षरशः खरे ठरले आहे.

लहानपणापासून जर विषय नाविन्यपूर्ण व आवडला असेल तर मग कितीही अवघड वाटला तर त्याच्या मुळापर्यंत जाऊन त्याला सोपे करण्याची माझी जिद्द!

भारतातील पहिल्या टेस्ट ट्युब बेबीची बातमी १९८५ मध्ये जानेवारीमध्ये झळकली. (खरे तर भारताची पहिली टेस्ट ट्युब बेबी १९७८ ची जगातील दुसरी, पण हे जगाला उशिरा लक्षात आले, असो) आणि मनात इच्छा जागृत झाली कि इथे आपल्याला पोचायचंय. कसे, कधी, केव्हा, कांहीच माहिती नव्हतं.

पण त्याचा पाठपुरावा करून २००४ मध्ये नागपूरमध्ये सेन्टर चालू केलं. त्यासाठी या ट्रेनिंगशिवाय सोनोग्राफी व लॅपरोस्कोपीचे ट्रेनिंग घेतले. २००३मध्ये मुंबईच्या कॉन्फरन्समध्ये इटलीचे डॉ. बेटोकीचे (फादर ऑफ ऑफिस हायस्टेरोसकॉपी) एक हायस्टेरोसकॉपी वर्कशॉप मी पाहिलं ! आणि लव्ह ऍट फर्स्ट साईट असंच काहिसं झालं. मग मी हिस्टेरोस्कोप घेतला व काम सुरू केले. तेव्हा हायस्टेरोसकॉपी वास लाईक अगली स्टेप – सिस्टर ऑफ लपरोसकॉपी. या तंत्रज्ञानाला कुठल्याही कॉन्फरन्समध्ये कुठेही भाव नव्हता. पण मला हे मनापासून आवडलं होतं. २०१० मध्ये नागपूरच्या एका कॉन्फरन्समध्ये मी हिस्टेरोस्कोपी वर्कशॉपची संयोजक (कॉन्व्हेंर) होते. आणि इजिप्तच्या डॉ. ओसामा शावकींची पहिली भेट झाली. मैत्री पण झाली. आमच्यात कुठेच कांही साम्य नव्हतं. पण ही मैत्री होणं हे जणु कांही विधीलिखितच होतं.

मी नकळत या तंत्रज्ञानाच्या प्रेमात पडत होते. माहिती मिळवत होते. एकदा नागपूरच्या भेटीत डॉ. ओसामांनी माझ्यासमोर हिस्टेरोस्कोपी कार्निव्हलचा प्रस्ताव ठेवला. अशी वैयक्तिक कॉन्फरन्स घेणे म्हणजे माझ्यासाठी आव्हान होते. त्याचवेळी माझी तीन अकॅडेमीक बुक्स जयपी ब्रदर्स पब्लिकेशन्स कडून प्रकाशित झाली होती. मी ठरवलं नागपूरमध्ये हिस्टेरोस्कोपीवर कॉन्फरन्स आणि ऑपरेटीव वर्कशॉप घेऊ. तसेच हिस्टेरोस्कोपीवर पुस्तक प्रकाशित करू. आमच्या नागपूरच्या गायनॅकॉलॉजीस्ट मैत्रिणीनी तेव्हा मला वेडयात काढलं होतं. (सौ देढसौ लोग भी तो आयेंगे क्या रे?) अर्थात ही त्यांची काळजी होती. पण माझी जिद्द होती. सर्व गोष्टींचा कसून अभ्यास केला. डॉ. सुधीरची (माझ्या पतीची) भरभक्कम साथ होती. आणि नागपूर हिस्टेरोस्कोपी कार्निव्हल लर्न अँड लव्ह ही कॉन्फरन्स २९, ३० नोव्हेंबर

२०१४ ला घेतली. आणि कार्निव्हल थिम प्रमाणे सजावट केली. दोन दिवसांमध्ये २८ हिस्टेरोस्कोपी सर्जरी केल्या व शिकवल्या. त्यासाठी मी चार महिन्यांपासून वेगवेगळ्या ठिकाणी कॅम्प घेऊन ५५ केसेस जमवल्या होत्या. कार्निव्हलला पूर्ण भारतातून अभुतपूर्व प्रतिसाद मिळाला. १००० पेक्षा जास्त डॉक्टर्स आले आणि दोन दिवस तिन्ही हॉल खचाखच भरलेले होते. इकडे बुक स्टॉलवर आमच्या हिस्टेरोस्कोपी पुस्तकाच्या २५० कॉपी विकल्या गेल्या. पारस पब्लिकेशनचे पब्लिशर म्हणाले, मैने सिर्फ २५० कॉपीज लायी थी। . और २०० की बुकिंग हुई है। ऐसा पहली बार हुआ है। हमेशा कॉन्फरन्समें मुश्किलसे १० कॉपी बिकती है।

या कॉन्फरन्सने नागपूर हायस्टेरोसकॉपी कार्निव्हल ला जगाच्या पाठीवर आणले. कारण आजपर्यंत जगात हिस्टेरोस्कोपी या तंत्रज्ञानावर एवढी मोठी कॉन्फरन्स कधीच झाली नव्हती. आणि ते पण कॉर्निव्हल सारखी सजावट करून.

जानेवारी २०१५ ची गोष्ट आहे. जयपी ब्रदर्स पब्लिकेशन्स च्या मॅनेजिंग डायरेक्टरचा फोन आला. त्यांना हिस्टेरोस्कोपीवर इंटरनॅशनल फॅकलटीस ना घेऊन पुस्तक हवं होते. यावेळी मला टेन्शन आलं. मला तर दोन-तीन इंटरनॅशनल फॅकलटीस शिवाय कुणीच माहिती नव्हतं. पण ते म्हणाले मॅडम आपसे ही ये बुक हमे चाहिए मी त्यांना नाही म्हणू शकले नाही. मी श्री गणेशाचे नाव घेऊन २१ सेकशन चा इंटरनॅशनल हायस्टेरोसकॉपी बुक चा आराखडा बनवला.

मी अनुभवले आहे.

जेव्हा तुम्ही एखादी गोष्ट निष्ठेने मिळवता,

तेव्हा ती मिळवण्यासाठी संपूर्ण ब्रह्मांड तुम्हाला साहाय्य करते.

ही उक्ती मी खरोखर अनुभवली.

डॉ. ओसामांनी माझी स्पेनच्या डॉ. लुईस ची ओळख करून दिली, म्हणजे ईमेल द्वारा. आणि मग रोज रात्री ११ ते २ माझे लुईसशी चॅटींग सुरू झाले. नंतरचे अवघड काम माझे होते. मी मग सगळ्या इंटरनॅशनल, नॅशनल फॅकलटीस बरोबर ईमेलद्वारा संपर्क साधले. एक वेगळंच हायस्टेरो - लव्हर्स चं अनोखं विश्व माझ्यासाठी खुलं झालं. आणि पुस्तकाची रचना झाली. इकडे कार्निव्हल फ ` व्हर पूर्ण भारतभर पसरला होता. मग २०१६ मध्ये परत एकदा नागपूर हायस्टेरोसकॉपी कार्निव्हल- उत्तरस इन फोकस आयोजीत केले. यावेळी ही कॉन्फरन्स पहायला स्पेनहून डॉ. लुईस, ईस्राइलहून डॉ. सर्जिओ, अमेरिकेहून डॉ. टोनी कारूग्रो आले. डॉ. ओसामा तर होतेच. १०, ११, १२ डिसेंबर २०१६ खुप मोठी कॉन्फरेन्स झाली. यावेळी आम्ही क्रिसमस थिम प्रमाणे डेकोरेशन केले होते. याच कॉन्फरन्समध्ये हायस्टेरोसकॉपी चं इंटरनॅशनल दुसरं मोठं बुक पब्लिश केलं. सर्जिओ, लुईस, टोनी कार्निव्हलचा आवाका बघुन चाट पडले. ते म्हणाले, आम्हाला हे आधी का नाही सुचलं? त्यांनी माझ्याबरोबर नागपूरमध्ये मिटिंग घेतली व मला बार्सिलोना, स्पेन मध्ये आमंत्रण दिले. (रेजिस्ट्रेशन + स्टे + ट्रॅव्हल स्पॉन्सरड) आणि मी २०१७ च्या मे मध्ये पहिल्या ग्लोबल हायस्टेरोसकॉपी कॉन्फरेन्स ला गेले. यावेळी सुधीरना जमत नव्हते. म्हणून माझ्या २ मधल्या मुलाला सुयशला घेऊन गेले. मला थोडे बेचैन वाटत होते. तिथे मी कुणालाच ओळखत नव्हते. मी तिथे पोचले तर मला डॉ. लुईस आणि डॉ. सर्जिओ यांनी प्रिकॉन्फरेन्स फॅकलटी डिनर ला बोलावले. मी तिथे गेल्याबरोबर तीन नवीन युरोपियन डॉक्टर उठून उभे राहिले व म्हणाले, आरे तू डॉ सुषमा देशमुख फ्रॉम इंडिया ? मी अवाक् ! मी हळूच हो म्हटलं. मग ते सगळे माझ्याशीच बोलत होते. त्यानंतर मी लुईस व सर्जिओ एकत्र बसलो व ग्लोबल कोम्मुनिटी ऑफ हायस्टेरोसकॉपी हे नाव फायनल केलं. दुसऱ्या दिवशी कॉन्फरन्स मध्ये दिवसभर कोणी ना कोणी मला बघून माझ्याजवळ यायचे व बोलायचे. मग मी बुकस्टॉलकडे गेले. ही ग्लोबल कॉन्फरन्स असल्यामुळे जगभरातील नावाजलेले डॉक्टर्स इथे आले होते. त्या बुकस्टॉलवर दोन भागांमध्ये वेगवेगळ्या प्रसिद्ध हिस्टेरोस्कोपी तज्ञ डॉक्टरांची पुस्तके होती. मला माझे पुस्तक कुठेच दिसले नाही. तेवढयात तिथे एक स्पेनचे प्रसिद्ध डॉक्टर जेमी फेरो आले. त्यांनी मला विश केलं. व त्या बुकस्टॉल वरच्या मुलीला माझ्या पुस्तकाची विचारणा केली. त्या मुलीने माझ्याकडे बघितले व हसली. ती बोट दाखवून म्हणाली, लुक देअर , युअर बुक ईस देअर बेस्ट सेलर कॅटेगरी मी अक्षरशः उडाले ! दुसरा बॉम्ब डॉ. जेमी फ ` रोनी टाकला. त्यांनी ते पुस्तक २३५ युरोला विकत घेतले. व माझी सही त्या पुस्तकावर घेतली. व त्यांच्या युनिव्हरसिटीमध्ये आमंत्रित केले. त्यानंतर एक इराकची डॉक्टर आली. तिनेही ते पुस्तक मागितले. पण दीड दिवसातच सगळ्याच कॉपी संपल्या होत्या. मग तिने माझ्यासमोरच पुस्तक व शिपिंगचे पैसे २७० युरो देऊन पुस्तक विकत घेतले.

मग २०१८ ला दिल्लीला हिस्टेरोस्कोपी कॉन्फरन्स घेतली. त्यात माझ्याबरोबर दिल्ली व चीनची हिस्टेरोस्कोपीस्ट चेअरपर्सन होते. तसेच व १८ इंटरनॅशनल फॅकलटीस होते. त्यावेळी पब्लिकेशन कडून परत हिस्टेरोस्कोपीवर १ पुस्तक प्रकाशित केलं.

त्यानंतर २०१९ मध्ये परत बार्सिलोना आमंत्रण व २०२० मध्ये कोविडमुळे ऑनलाईन कॉन्फरन्स, २०२३, २०२६ (इटली) असं सर्व कांही वेगाने चालू झालं. २०१९ मध्ये इटलीमधील बोलग्रा येथे डॉ. गुब्बीनी (फादर ऑफ मिनी रेसेक्टस्कोप) यांच्याकडे मी गेले. डॉ. गुब्बीनी व त्यांची पत्नी लॉरी तसेच डॉ. सर्जिओ व त्यांची पत्नी याफा यांच्याशी माझी जीवाभावाची मैत्री आहे.

आज मी दिल्लीच्या एका ग्रुपबरोबर ऑनलाईन हिस्टेरोस्कोपीचे क्लास घेते, हॉस्पिटलमध्ये वर्कशॉप घेते. जगातल्या सगळ्या हिस्टेरोस्कोपी तज्ञांबरोबर गप्पा मारते.

हिस्टेरोस्कोपीने मला खुप कांही दिलं ! जगभर मान्यता मिळाली, जगभराचे हायस्टेरो लव्हर्स जन्माचे मित्र मैत्रिणी झाले.



My journey - Eyesight to Insight

eyesight to insight कबीराने सांगितले देव आणि गुरु समोर आले तर आधी गुरुला वंदन कारण देवाकडे जायची वाट गुरूने दाखवली. ज्या मातीने घडवले तिथेच ज्ञान दानाचे काम ३०वर्षे करताना चलने दो चलता हे न करता पीजी स्टुडंट च्या आयुष्यात सकारात्मकआणि त्यांच्या बॅटरमेंट साठी आपल्या वर्षा ने केलेले प्रयत्न तुम्हाला थक्क करतील आणि अभिमान वाटेल.



डॉ.वर्षा नांदेडकर

निवांत क्षणी समुद्रकिनारी बसलेली असताना ६० वर्षांचा आयुष्याचा कालावधी नजरे समोर आला व जाणवले की समुद्रासारखेच सर्वसमावेशक बनायचे.

ह्यात प्रामुख्याने आयुष्यातील युथ पिरियड जो मोस्टली मेडिकल कॉलेज मध्ये व त्यातला व त्यानंतरचा आता आतापर्यंतचा काळ ह्याच कॉलेजमध्ये व्यतीत झाला.

पहिल्या वर्षाच्या काही अविस्मरणीय आठवणी अनाटोमी डीसेकशन हॉल , टेबल्स, टेबल पार्टनर्स येथेच पहिला संस्कार घडला की आता नो मोर स्पून फीडिंग . घडवा स्वतःला.

लक्षात राहिलेल्या काही गोष्टी म्हणजे शेख सरांचे रोज त्याच रंगाचे कपडे, महाजन मॅडमचे लॉक अँड की मॉडेल, फिसियॉलॉजि तील मुजूमदार मॅडम, शिंगाडे मॅडम सारख्या सुंदर शिक्षिका. मला आठवते गोसावी मॅडमने संक्रांतीला अख्ख्या वर्गाला तिळाचे लाडू देऊन सदिच्छा दिल्या होत्या.

त्याकाळात मज कुलकर्णीची बहीण वंदना २ इयर होती. तिने सांगितले होते की नेक्स्ट इयर पासून क्लिनिकल सबजेक्ट्स सुरु होतील व आपल्यातला उत्साह वाढेल व आठवते की रसवंतीवर बसलेले असताना असे मनात यायचे की, ह्या शिक्षणात आमचा देखील असाच रस काढून घेणार व आम्ही चिपाडे बनणार.

तसेतर बऱ्याच शिक्षकांनी छान शिकवले पण काहींच्या आठवणी अविस्मरणीय.

त्यात ऑर्थोपेडीक्स चे कापडिया सरांचे ६.३० वाजेपर्यंत जीव ओतून शिकवणे. .. व मुळेसरांचे व पीडियात्रिक्स च्या गुजराती सरांचे अप्रतिम शिकवणे, मेडिसिन चे क्लिनिकल राऊंड्स विथ बोरकर मॅडम, चव्हाण सर, उकडगावकर सर अशा अनेक शिक्षकांनी विद्यार्थ्यांवर छाप टाकली.

त्यावेळेस वाटले पण नाही की, पाथोलॉजि चे अनिल जोशी सरांची आपल्या आयुष्यावर अशीच छाप पडणार आहे.

इंटर्नशिप नंतर पदव्युत्तर प्रशिक्षणासाठी जॉईन केले. माझा असा समज आहे की, च्या काही काळापर्यंत आपण मेंढरासारखे एकत्र असतो. पण खरी इंडिव्हिड्युअल आयडेंटिटी .. पासून सुरु होते.

''नशीबवान मी ज्या मातीने आपल्याला घडवले त्याच मातीत ज्ञानाचे रोपटे फ ुलविण्याचे भाग्य मला लाभले !''

पहिल्यापासूनच शिकवण्याची आवड असल्यामुळे शिक्षकी पेशा खूपच भावला, मनाला खुलवत गेला घडवत गेला. ३० वर्षे आनंदाने सोबत पदव्युत्तर तरुणाईचा सहवास घडत गेला त्यांच्यातील अनेक पैलूंचे दर्शन घडत गेले.

नवीन पिढी, त्यांचे संस्कार आमच्या पिढीपेक्षा भिन्न. सुरुवातीला मॅच करणे जड होते. जसा जसा आमचा अनुभव वाढतो, आमच्यातली मॅच्युरिटी वाढते, सॉफ्टनेस वाढतो तसे आपण त्यांच्यात विश्वास रमुन जातो, घट्ट जातो. तसेच विश्वासास पात्र झाल्यावर ते त्यांचे गुपिते देखील आमच्या बरोबर शेअर करतात.

त्यांचे प्रॉब्लेम्स , चालेंजस, स्ट्रेस पाहिल्यावर असे जाणवते की फोरच्युनटली आमच्या काळात स्ट्रेस हा शब्दच नव्हता. .. मिळणे देखील एवढे जड नव्हते.

ह्या विद्यार्थ्यांना प्रथम वर्षापासूनच .. एंट्रन्स ची तयारी, कोचिंग क्लासेस इ. ऑल इंडिया एंट्रन्स टेस्ट असल्यामुळे ह्यांचा स्ट्रेस आणि वाढला, त्यातूनच आजकाल पेपरफ

ुटी वै. त्यामुळे एका बॅचमध्ये ३०-४० % विद्यार्थी काउनसेलिंग किंवा थेरपी घेत असतात.

लहान वय असते, नवीन अडजस्टमेन्ट असते काही ना काही प्रमाणात सिनियर्स चे, रेसिडेन्ट्स चे कुठेकुठे टॉरचर असते. मग कधीतरी कोणी ब्रेक डाउन होते.

मला आठवते ४ वर्षे अंबाजोगाई येथे सेवा देऊन २०१५ ला जेव्हा मी वापस येथे आले त्यावेळेसची गोष्ट.

बातमी आली की १ जुनिअर रेसिडेंट बोलून बसली की मी सुसाईड करणार. कारण काय तर सिनियर रेसिडेंट ने झापले होते. हा पहिलाच असा प्रसंग ॲज एचओडी माझ्यासमोर. मग धावपळ करून तिला व तिच्या बॅचमेटसला घरी केलेली काउनसेलिंग, प्रॉब्लेम ची सांगता त्यांना आइसक्रीम खिलवून केली, त्याआधी मिटींग्स , इ.सिनियर बॅचेस ला परिस्थितीचे गांभीर्य समजावणे वगैरे. पुढे देखील असे प्रसंग येऊ नयेत म्हणून केलेली पूर्वतयारी वगैरे.

हा तर वगैरे असे काही मोठे प्रसंग वगळता त्यांचे छोटे-छोटे प्रॉब्लेम्स देखील असायचे जेवताना उठावे लागणे, ओटी त सिनियर रेसिडेंट ने चपला उचलायला लावणे, त्याचे वॉर्ड मधील कामे करायला लावणे वगैरे. १ विद्यार्थिनी नॉन - ट्रेसेबल. शोधाशोध शोधाशोध. मग झाली ट्रेस आऊट . आजकाल असे एक निदर्शनास आले आहे की एका बॅच चे विद्यार्थी एकत्र असतात ते तरी बरे.

एकदा लीड सुचर एमेरजेन्सीत करायला लावले .. ने त्यावरच प्रॉब्लेम झाला. हळूहळू ते देखील ह्यातून बाहेर पडतात.

नेत्रविभागात काही विद्यार्थ्यांना मायक्रोसर्जेरी चा स्ट्रेस येतो कॉम्प्लिकेशन्स होतात. त्याकरिता देखील नियम होता की ऑपेरेशन नंतर विद्यार्थ्यांनी मिळून डिसकस करायचे, त्यावेळेस नेमका कुठल्या स्टेज चा प्रॉब्लेम आला का आला त्यावर विना रागावता सखोल चर्चा करून नेक्स्ट टाइम्स साठी प्रिकोशन्स, मोटिवेटस मोटिवेशन , सुपरव्हिजन ऑफ नेक्स्ट सर्जेरी अशा उपायांनी विद्यार्थी रिलॅक्स्ड होतो.

नवीन पिढीला जीवापाड जपावे लागले. त्यांना .. ॲक्टिव्हिटी ला देखील मोटिवेट करत राहावे लागले.

एक लक्षात आले की ह्या पिढीला सोपे मार्ग आवडतात जसे की चॅट चा वापर पुस्तकांपेक्षा जास्त, थेसिस देखील कोणा एक्स्पर्ट कडून डेटा देऊन करणे वै.

हे विद्यार्थी वागणे, बोलणे, परिस्थिती टॅकल करण्याची क्षमता, अंतर्मुखता, बाह्यमुखता ह्यात भिन्न असतात, आपण जर मातृत्वाच्या भावनेने ह्यांच्याकडे पाहिले तर हंसबुद्धी बनून ह्या प्रत्येकातले चांगले गुण वेचण्याची संधी आपल्याला मिळते.

शेवटी प्रत्येक नाते हे एनर्जी एक्सचेंज वर बसलेले असते नात्यात जी एनर्जी इन्व्हेस्ट कराल तीच तुम्हाला मिळते.

ह्या विद्यार्थ्यांना, तरुणाईला, त्यांच्या पंखांना विश्वासाचे बळ देऊन, त्यांना यशाच्या आकाशात उंच भरारी घेण्यास सक्षम करण्याची संधी शिक्षकांना मिळते नक्कीच.

बायोकेम लैबची धमाल

१९४३ ,जानेवारी महिन्याच्या प्रथम आठवडयात मेडिकल ला प्रवेश मिळाला घरात खूप आनंदी आनंद झाला , मला late admission मिळाली होती... माझा Roll No १०७ होता..माझं देखील नियमित roster प्रमाणे ,practical batches सुरू झाल्या... आणि माझ्या Biochemistry च्या batch मध्ये Dr.निरज दुबे देखील नाव होतं...एके दिवशी त्याला गंमत सुचली, तसा तो विनोदी च होता...त्याने एक practical च्या batch मध्ये Concentrated HCL, Potassium permagnate ani Sodabicarb सगळं छान MiX करून ठेवून दिल आणि माझं लक्ष गेलं ,की हा मुलगा काय ,काय ,मिक्स करतोय.....त्याने ते बघितलं ,माझ्या जवळ आला आणि म्हणाला Shevgan plz dont tell anyone ...today i am playing game ...no one should get correct reading...गंमत म्हणजे शेख सरांची मजा घायची(बिचारे गरीब आणि चांगले सर होते)...त्या batch मध्ये फक्त माझी आणि त्याचीच reading बरोबर ...बाकी सगळेच बिचारे परेशान होते ...आणि Dr दुबे शांत पणे जणू काही घडलेच नाही बघत होते अशा प्रकारे त्यादिवशी

Practical मध्ये गंमत झाली.

दुसरा किस्सा रॅगिंग चा.

माझी आणि अंजु शिंदे ची raging घेतली ...आम्हला फक्त एकच task दिला होता ..दोघींना मराठीत हसायचं

- डॉ.शीला वर्मा



Week One, Almost Gone

week one almost gone '' आपल्या बैच च्या मोस्ट नटखट लॅड ची न वापरलेल्या ट्रेन तिकीटाची कहाणी हेलावून सोडेल. खास दुबेजी शैलीतील दिल ,दोस्ती ,दुनियादारी!



डॉ नीरज दुबे

Day one. I rolled into the hostel like a Bollywood hero entering his destiny — suitcase in one hand, dreams in the other. By 7 PM, a senior had me reciting the national anthem backwards, on one leg, in front of an audience that judged me harder than any professor ever would. Final verdict: I sang like a dying goat. Respect: revoked.

Day two. The dissection hall. I entered like a future surgeon. I exited like a man who'd personally negotiated a truce with Death, because the formaldehyde fumes hit like a chemical uppercut. My eyes wept without my permission. My lunch filed for divorce and left immediately. Somewhere, my ancestors facepalmed.

Day three. I snapped. Between the ragging, the fumes, and missing my mother's dal like an addict misses his next fix, I sprinted to the railway station and bought a one-way ticket home — no negotiations, no refunds, no shame. That night I lay in bed clutching that ticket like it was the winning lottery number, mentally rehearsing my resignation speech to a medical career that had lasted exactly 72 hours.

Then week two happened, and honestly, rude of it to be this good.

A total stranger showed up at 2 AM with Maggi noodles and zero explanation. The very senior who'd humiliated me now taught me the ancient art of vanishing before "voluntary" push-ups started. My tormentors became my partners in crime. My trauma became inside jokes. Somewhere between noodles, nonsense, and questionable hygiene, I forgot I ever wanted to leave.

By the end of that week, Aurangabad had kidnapped my heart and refused to give it back. The formaldehyde still smelled like regret, but I'd stopped noticing — too busy laughing to breathe properly anyway.

That train ticket? Still unused. Retired permanently, right next to every clinical rotation I skipped, because apparently leaving the boys' hostel — even for actual medicine — felt like treason.

Moral of the story: Give any hell exactly seven days before quitting. By day two you'll hate everything. By day seven, someone will hand you Maggi at 2 AM and you'll forget you ever owned a suitcase. Also — attendance is optional when the hostel WiFi is good and your friends are better.

***

फिर उसी राह पर मिलें हम.....

सन् तिरासी में जो सफ़र का कारवाँ निकला था,
एक सपना था, जो हर इक दिल में जगा निकला था।

नई किताबें, नए चेहरे, नई थीं मंज़िलें,
हर किसी का रंग अलग, पर सिलसिला निकला था।

कभी नाटक की तालियों में नाम गूँजा रात भर,
कभी मैदानों में पसीने का नशा निकला था।

किसी से रूठना भी था, किसी को मनाना भी था,
हर तकरार के पीछे प्यार ही छिपा निकला था।

छात्रालय की वो चाय, वो भोजनालय, वो लंबी महफ़िलें,
हर हँसी में ज़िंदगी का फ़लसफ़ा निकला था।

प्रशिक्षण-आवधी नें फिर हमें ज़िम्मेदारियाँ सौंप दीं,
बचपनसा हर ख़्वाब धीरे-धीरे विदा निकला था।

फिर सभी अपनी-अपनी राहों के मुसाफ़िर बन गए,
कोई पूरब, कोई पच्छिम, कोई उत्तर, कोई दक्षिण, जुदा निकला था।

साल गुज़रे, उम्र बदली, वक़्त ने करवटें लीं,
पर दोस्ती का दीप हर दिल में जला निकला था।

आज फिर दो हज़ार छब्बीस ने ये पैग़ाम दिया,
छोड़कर सब काम, मिलने का समाँ निकला था।

आओ फिर जी लें वही किस्से, वही शरारतें सभी,
क्या पता फिर साथ रहने का कहाँ निकला था।

दो घड़ी हँस लेंगे, कुछ आँखें भी शायद नम होंगी,
हर खुशी के साथ थोड़ा ग़म मिला निकला था।

फिर सुबह होगी, फिर सभी अपनी दिशा चल देंगे,
ज़िंदगी का यही तो सबसे बड़ा फ़लसफ़ा निकला था।



जाते जाते,
‘‘ दोस्तियों की ये अमानत उम्र भर महकेगी यूँ,
फिर मिलेंगे इस यक़ीं का आसरा निकला था। ‘‘

– संजय सुर्यवंशी

बॅच ८३ (मेडिकल)

बॅच आमुची ८३ ची
करी भाषा सव्यसाची
मारून मुटकून कोणी नसे
निखळ हास्य ओठी असे
नाहीत कोणी चाकरमानी
सर्वच जण स्वाभिमानी
बाष्कळपणाही भरलेला
बुध्दीमत्तेतही पुढारलेला
अध्यात्मातही मागे नसे
राजकारणानेही भारला असे
समाजसेवेतही पुढारलेला
विनोदातही निखाळलेला
भाषा आमुची खळाळती
सर्वांना मनोरंजविती
माणुसकी हाच धर्म
तत्वे हीच सत्कर्म
लढतो आम्ही लुटुपुटीचे
आतून मित्र सच्चाईचे
ॲडमीन आमचा महाथोर
म्हणतो आम्हा , करू नका शोर
धमकी त्याची जिवघेणी
पण मात्र , लोभस करणी
सुना , जावई , नातवंड आली
तरी आम्ही -मुलं आणि मुली
सर्वच जण कर्तृत्ववान
तरीही म्हणती, घरटे आपुले छान (घरटे म्हणजे बॅच)
असे आम्ही सर्वधर्मीय , सर्वपंथिय आत्मभान
सर्वांच्या हृदयावर विराजमान
सर्वांना नमस्कार छान छान

– वर्षा पाटील – देशपांडे

साठ ओलांडली, पण थकलो नाही,
जंगल बोलावतं, आम्ही चुकलो नाही,
हातात हात घालूनी शपथ घेऊ या,
शतायुषी होऊ, हसत जगू या !

पांढरा कोट घातला तेव्हा स्वप्न पाहिलं,
सेवेचं व्रत तेव्हाच मनात वाहिलं,
आज केस पांढरे झाले तरी काय झालं,
मैत्रीचं नातं आजही तसंच राहिलं !

पुढची वीस-तीस वर्ष असंच भेटू,
हसत खेळत जीवन जगू
देह थकला तरी चालेल,
मन तरुणच ठेवू !



– स्मिता कोल्हे

आम्ही डॉक्टर

कॉलेजचे दिवस आठवतां
मन भरून येते आता
प्रथम वर्ष डिसेक्शन हॉल
गमती जमती होत्या फार
फिजिऑलॉजी , बायो केमिस्ट्री
वाटत होती एक मिस्ट्री
द्वितीय वर्ष पॅथॉलॉजी , फारमॅकॉलॉजी
अभ्यास करता व्हायची डोकेदुखी
बेडसाईड क्लिनिक्स लय भारी
त्यानंतर असे रसवंती (ऊस) न्यारी
मजा करता सरले तीन वर्षे
कठीण राहिले शेवटी दीड वर्षे
दहा विषय , क्लिनिक्स व अभ्यास
धावपळ करता व्हायची दमछाक
हा हा म्हणता तेही सरले
नाही म्हणता मार्कही मिळाले
आनंद गगनात मावेना
डॉक्टर झालो , विश्वास बसेना
आईवडिल झाले खुश
इंटर्नशिप , स्टायपेंड , आम्ही गुल
पालकांना लागले वेध लग्नाचे
आम्हीही पाहिले स्वप्न भविष्याचे
हा हा म्हणता संपली इंटर्नशिप
हातात होती पुढची रेसिडेंटशिप
दिवस रात्र वार्डांमधे
कधीतरी सिनेमामधे
पाहता पाहता परिक्षा आली
कॉलेज लायब्ररी भरून गेली
मधूनच असे शेट्टीचा चहा वडा
अभ्यासाचा आव मात्र पहा
बेजार आम्ही डुलक्या घेऊन
पण पास झालो मार्क घेऊन
स्पेशिआलिस्टचा शिक्का बसला
अभिमानाचा क्षण ठरला
आयुष्य सर्व पेशंट पाहण्यात
आणि , मजेने टेंशन घेण्यात
करियर , घर - सरबराई
आम्ही स्वत: ला विसरून जाई
असे आमचे आयुष्य असते
पुन्हा पुन्हा जगावे वाटते .



– वर्षा पाटील – देशपांडे

दिल है घाटीका

दिल है घाटीका प्यार भरी दोस्तीका
मस्ती भरे मनका छोटासा सपना
साथ साथीयोंको खुष रखनेकी आशा
सबको लेके उडनेकी आशा

गाना गाऊ मै आज तो ऐसे
तितली बगीयां मे झुमे है जैसे
अपनी ऊंगली मे समेट लू खुषीया
दोसती की मै लिख लू कहानीया
बादलोंमें मै बना दू रंगोलीयॉ

धरती पे स्वर्ग ही बस गया जैसे
खुषीया ही खुषीया बरसी ही जैसे
चांद तारों से सिखू मै हसना
सूरज की तरह आना और जाना
षष्ठी है लायी अनमोल गहना

– डॉ. सुषमा देशमुख

सारी उमर हमे साथ रहना है

फुल और तारे भी सब गवाही है
एक लाखो मे मेरे साथी है
सारी उमर हमे साथ रहना है

कॉलेज की ए छोटी छोटी यादे है बडी
आज भी लगता है वो थम जाए घडी
यही बातोंकोही दिलमें रखना है
सारी उमर हमे साथ रहना है

याद आते है वो लम्हे हमेशा
छेडा छेडी मे वो प्यार बरसा
झगडा होने पर भी माफ करना है
सारी उमर हमे साथ रहना है

कैसे बताऊ आज भी वो पल देते है खुषी
सबकी अनमोल यादे, उसमे है बसी
सबने साथ रहने की कसम लेना है
सारी उमर हमे साथ रहना है

सुखदुख हर एक जीवन में आए है जरूर
हम सबको एक होकर खुषीयोंसे होना है चूर
मैत्र संगीत मे ही डुब जाना है
सारी उमर हमे साथ रहना है

– डॉ. सुषमा देशमुख



आठवणींच्या हिंदोळ्यावर.....

साठ वर्षांचा काळ संपला
आयुष्य चालले पुढे
डोक्यावरती केस रुपेरी
मैत्रीचा रंग मात्र अजूनही चढे ..
कॉलेजाचे ते सुंदर दिवस
आठवणींचा खजिना खुलला
वर्षे सरली काळ बदलला
मैत्रीचा धागा परी ना तुटला ..
सुख दुःखाचे ऊन पाऊस
धावपळ झाली संसारात
कॉलेजाची मैत्री मात्र
जपली मनाच्या कोपऱ्यात ...
आज पुन्हा भेटूनी
जाग्या केल्या आठवणी
वय भान विसरून चला
पुन्हा जाऊया तरुणपणी
चला मित्रांनो भेटत राहू
हसत खेळत, गप्पा मारत,
आठवणींच्या हिंदोळ्यावर
८३ च्या या बागेत,
पुन्हा पुन्हा फुलत राहू



– डॉ.प्रमोद निचत



नादब्रह्माच्या वाटेवरील मी प्रवासी

वयाच्या ४५ नंतर सुरू केलेला नादब्रम्हाचा प्रवास आणि रियाझ आणि निरंतर शिक्षणाने गाठलेले एकेक टप्पे! संध्या संगीत विशारद तर झालीच शिवाय एसएनडीटी पुणे च्या सुगम, नाट्य संगीताच्या पदविका मिळवल्या. संगीत नाट्य स्पर्धेत पण मोहोर उठवली. सगळीकडून मोहरून आलेल्या कलाकाराचा कला प्रवास सुरांच्या मोहिनेचे भारुड टाकतो आणि कलाकाराचे पाय किती जमिनीवर रोवले आहेत ते वाचताना तिच्या गुरुभक्तीतून कळते. प्राउड ऑफ यू डिअर संध्या!



डॉ.संध्या मानवतकर

काही गोष्टी आयुष्यात ठरवून होत नाहीत. त्या आपल्याला हळूहळू आपलंसं करून घेतात.

गाणं माझ्या आयुष्यात असंच आलं... आणि हळूहळू ते कधी माझ्या जीवनाचं अविभाज्य अंग बनलं, ते कळलंच नाही.

वयाच्या ४५ व्या वर्षापर्यंत कधीच वाटलं नव्हतं किंवा ते कधी माझं स्वप्नही नव्हतं, की तबला पेटीच्या सुरा तालात गाईन म्हणून..

लहानपणी घरी आरत्या वगैरे म्हणणं, आणि रेडीओवर गाणी ऐकणं या पलीकडे गाण्याचा विशेष संबंध नव्हता आला..

नाही म्हणायला शाळेत केवळ एक हुशार विद्यार्थिनी म्हणून, एका समूहगीतात कोरस दिला होता.

पण त्याचं असं झालं, आय एम ए कांदिवली तर्फे संपूर्ण महाराष्ट्रात होणाऱ्या आय एम ए च्या गाण्याच्या स्पर्धेमध्ये,परभणीच्या स्पर्धेत मला सूत्रसंचालनाचे किंवा निवेदनाचं काम सोपवण्यात आलं होतं.

मजकूर चांगला तयार करता यावा म्हणून मी दोन-तीन दिवस त्या लोकांची प्रॅक्टिस ऐकायला जात होते. त्यावेळी मला तीव्रतेने वाटायला लागलं की काय ही लोक गाणी गातात?!!

यांच्यापेक्षा तर मी चांगलं म्हणू शकेन.. हा.. हा.. हा..

मग आले आपले,पहिले वहिले गेट-टुगेदर!! म्हटलं चला आता इथे आपण संधी घेऊ!

म्हणून एक गाणं शिकण्यासाठी इथल्या सौ अर्चना खासनीस मॅडम कडे गेले. त्याआधी माझ्या इतर मैत्रिणी मला खूप आग्रह करायच्या, ''येना आमच्या क्लासला''..पण माझा सपशेल नकार असायचा. पण आता मात्र गेले शिकायला.

मॅडमने पेटीचा सूर धरला आणि मला गायला सांगितले...आणि फुस्स.... माझ्या गर्वाचा फुगा फुटला की हो!!!

आणि आजतागायत तो फुटलेलाच आहे!!

त्यावेळी मला कळले की सुरात गाणे किती अवघड असतं ..एकदा धरलेला सूर शेवटपर्यंत टिकवणं किती कठीण असतं..एकीकडे सूर पकडायचा तर दुसरीकडे ताल धरायचा हे म्हणजे इकडे तिकडे पळत सुटणाऱ्या कोंबडीला पकडण्या एवढं अवघड वाटलं..

सुरुवातीला तर मी माझं गाणं म्हणेन तुम्ही तुमचा सूर धरा आणि ठेका वाजवा अशा थाटात गाणं सुरू झालं.. घरात रात्रंदिवस बेसूर आणि मोठ्या आवाजात गाणी गायला लागले.

नवरा,मुलं परेशान!! घरातल्या कामवाल्या मावशा तोंडाला पदर धरून हसायला लागल्या..

पण वेताळाने आपला हट्ट सोडला नाही. गाणं आता सोडायचं नाही हे पक्क ठरवलं.

नंतर गुरुजी श्रीकृष्णराज लव्हेकर यांची भेट झाली. ते म्हणाले, मॅडम गाण्याला शास्त्रीय संगीताची बैठक असावी लागते. म्हटलं होऊन जाऊ द्या!!

नवरा पण शास्त्रीय संगीताचा शौकीन असल्याने लगेच मनावर घेतलं . एक एक करत चार परीक्षा झाल्यावर वाटलं आता पुरे...

सरांच्या माझ्यावरील मेहनतीमुळे गांधर्व महाविद्यालयाच्या परीक्षेत पास होणे तेवढे अवघड वाटले नाही.

मग विशारदच्या परीक्षेला बसा म्हणून आग्रह होऊ लागला..पण आपण विशारद परीक्षेला बसावं एवढं माझं गाणं नाही, हे मात्र मला कळत होतं.

पण गुरुजींचे म्हणणे की तुम्हाला गळ्याची

नैसर्गिक देण नसली तरी, मेहनत केली तर नक्की पास व्हाल. आणि अशा तऱ्हेने शेवटी २०१९ ला विशारद झाले.

पण आता मात्र नादब्रह्माचा फारच लळा लागला होता डॉक्टर असल्याने माझ्या इवल्याशा गाण्याचे भले मोठे कौतुक होऊ लागले.. पण मी खरोखर मनापासून सुरांची उपासना करायला लागले.

एव्हाना माझं संपूर्ण रुटीनच बदललं होतं रोज सकाळी अर्धा एक तास रियाज केल्याशिवाय चैन पडत नसे.रियाज नाही झाला तर दिवस वाया गेला किंवा काहीतरी चूक झाली अशी भावना येऊ लागली.परीक्षेच्या माध्यमातून गाण्यामागचं शास्त्र जाणून घ्यायला पण मजा येऊ लागली. गाणं जसं जसं शिकतं जातेय तसं तसं कळत जातंय की त्या अथांग महासागरातला एक तुषार देखील आपल्या ओंजळीत येत नाहीये.

ज्यांनी लहानपणापासून गाण्यासाठी संपूर्ण आयुष्य वेचलं त्यांच्याबद्दल आणि जे गाणं न शिकता ही नैसर्गिक प्रतिभेने अत्यंत सुरेल गातात त्या दोघांबद्दलही माझ्या मनात प्रचंड आदर आहे. त्यांच्या उत्तुंग प्रतिभापुढे माझं शिर नेहमीच आदराने झुकलेलं असतं. पुढे करोना काळात एसएनडीटी पुणे विद्यापीठाच्या सुगम संगीत व नाट्य संगीताच्या डिप्लोमा अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने पूर्ण करून डिप्लोमा इन लाईट वोकल म्युझिक ही पदविका मिळवली.

सुरांच्या साथीने जी मनाला अद्भुत शांतता लाभते,त्याची कशाशीच तुलना होऊ शकत नाही. सुरांची साधना ही ईश्वराचीच साधना आहे. त्यासाठी एक जन्म पुरेसा नाही.

या जन्मी शिदोरी गोळा करते आहे,पुढच्या जन्मी थोडे तरी सुर गळ्यात वसावेत यासाठी.

गाणं शिकत राहणे हेच या जन्मीचे विहित कर्म आहे असं मानून, ते कर्म मी करीत राहणार आहे.

गाणेच अंतरी अन गाणे दिगंतरी
गाण्यात शोधीतो मी माझाच श्रीहरी

हा नादब्रम्हाच्या वाटेवरचा प्रवास आनंद देणारा आहे.पण कितीतरी असे प्रसंग आलेत, की अतिशय नैराश्य, अपमान, खजीलपणाची भावना आणि खंत वाट्याला आली आहे. जी प्रत्येक संगीत साधकाला येतच असते, नव्हे तो या प्रवासाचं अविभाज्य अंगच आहे.

मेडिकलच्या परीक्षेचा कधी एवढा ताण आला नसेल एवढा या गाण्याच्या परीक्षेचाच नाही, तर प्रत्येक वेळी गाणं सादर करताना देखील येतो.

पण या गाण्याने मला एक वेगळी ओळख प्राप्त करून दिली!! लहान गावात तर फारच कौतुक असतं डॉक्टर असून गातात...

नवीन वर्तुळं तयार झाली, नवीन प्रकारची माणसं भेटली, विचारांना, चर्चेला,गप्पांना नवीन विषय मिळाला. खूप भरभरून दान दिले या गाण्याने मला !!!

ही कृतज्ञता कृतीतून व्यक्त करण्यासाठी गेल्या सोळा वर्षापासून आम्ही सासूबाईंच्या स्मरणार्थ,शांताबाई मानवतकर स्मृतीसंगीत समारोह दरवर्षी कुठल्याही प्रायोजका विना आयोजित करून,स्थानिक व राष्ट्रीय पातळीवरील कलाकारांचे गाणे रसिकांसमोर आणतो.

शेवटी शिकण्याला वय नसतं आणि सुरांच्या साधनेला पूर्णविराम नसतो,हेच सत्य आहे.

स्वरांचे हे देणे मला लाभले ईश्वराचे
गात गात जावे मी गाणेच प्रभूचे

धन्यवाद

Golden Memories....





असेही एक वळण....

सगळे उत्तम स्थिर चालू असताना सृजनशील मनाला येते एक अस्वस्थता! आणि ५ मैत्रिणीने काही नविनच करायचे ठरतले. चक्क एक उत्तम होटल काढायचे ठरले . आणि त्या प्रोजेक्ट ची आखणी केली आणि खरेदीसाठी चक्क चिन गाठले. या प्रवासातले उदबोधक अनुभव आणि सोबत काही चिंतन देखील. किती समरसून एखादे काम करावे याचा आदर्श वस्तुपाठ यात वाचायला मिळतो .



डॉ. ज्योत्स्ना डौले

मी डॉ. ज्योत्स्ना डौले गेली साडेतीन दशके मी स्त्रीरोग तज्ज्ञ म्हणून माझा व्यावसायिक प्रवास करत आहे. डॉक्टर म्हणून काम करताना महिलांचे आरोग्य आणि त्यांच्याशी जोडलेले अनेक पैलू हे माझ्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनले. पण आयुष्य म्हणजे केवळ आपल्या परिचित वाटेवरून चालत राहणे नव्हे. कधी कधी एखादे नवीन वळण आपल्याला स्वतःचीच एक नवी ओळख करून देते. असेच एक वळण माझ्या आणि माझ्या चार डॉक्टर मैत्रिणींच्या आयुष्यात आले.

डॉक्टर मैत्रिणींचा उद्योगविश्वात प्रवेश

आमचा सगळा ग्रुप व्यवसायाने डॉक्टर. पण एके दिवशी आम्ही पाच जणींनी ठरवलेआपल्या डॉक्टरकीच्या पलीकडेही काहीतरी नवीन करून पाहूया! वृंदावन लॉन्सच्या परिसरात एक मोठे हॉटेल उभारण्याचा निर्णय आम्ही घेतला. बांधकामाचा आराखडा तयार झाला आणि प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली.

सुनिता, स्मिता आणि रुपाली या तिघींनी बांधकामाच्या कामात अक्षरशः खूप मेहनत घेतली. मी आणि सीमा या संपूर्ण प्रकल्पात वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सांभाळत होतो. आर्किटेक्ट कोण? इंजिनिअर कोण? कोणत्या एजन्सीला कोणते काम द्यायचे? कोणते मटेरियल घ्यायचे? डिझाइन कसे असावे? आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, या संपूर्ण प्रकल्पाला आपल्या मनासारखा आकार कसा द्यायचा आणि मग आली चीनची वेळ...बांधकाम पुढे गेले आणि आता वेळ आली ती फर्निचर आणि इंटिरिअर डेकोरेशनची. खूप चौकशी, चर्चा आणि माहिती घेतल्यानंतर आम्ही ठरवले की हॉटेलसाठी लागणारे फर्निचर आणि काही इंटिरिअरचे साहित्य चीनमधून आणायचे.

मग प्रश्न आलाचीनला कोण जाणार? कधी जाणार? कुठे जाणार?

शेवटी पुन्हा एकदा आम्ही पाच मैत्रिणींनीच चीनला जाऊन खरेदी करायची असे ठरवले.

आमचा प्रवास पुणेबँकॉकहाँगकाँगफोशान असा झाला. फर्निचरसाठी प्रसिद्ध असलेल्या फोशानमध्ये आम्ही पोहोचलो आणि आमच्या चीनच्या व्यवसायिक प्रवासाला खरी सुरुवात झाली.

''चायनीज माल'' म्हणजे निकृष्ट?

भारतामध्ये आपण अनेकदा ऐकतो''चायनीज माल म्हणजे स्वस्त, पण टिकाऊ नसतो.'' मनात ही शंका होती. पण चीनमध्ये प्रत्यक्ष गेल्यावर मला जाणवले की ही समजूत किती अपुरी आहे! फोशान आणि आसपासच्या परिसरात फर्निचरची जी प्रचंड दुनिया आम्ही पाहिली, ती अक्षरशः डोळे विस्फारून पाहावी अशी होती. उत्तम दर्जाचे, उच्च प्रतीचे फर्निचर; त्याचबरोबर वेगवेगळ्या बजेटमध्ये असंख्य पर्याय. आपल्याला जसे हवे तसे डिझाइन, आकार, मटेरियल आणि फिनिशिंग करून देण्याची त्यांची क्षमता विलक्षण होती.

फर्निचरच्या दुकानांच्या रांगा?

एक लेन जवळजवळ वीस किलोमीटर लांब आणि अशा अनेक लेन्स! आम्ही अक्षरशः थक्क झालो. आणखी एक आश्चर्यव्यवसायाच्या केंद्रस्थानी महिला! या प्रवासात मला सर्वाधिक भावलेली गोष्ट म्हणजे तिथे मोठ्या प्रमाणावर महिलांचा व्यवसायातील सक्रिय सहभाग. आम्ही भेट दिलेल्या अनेक दुकानांमध्ये महिला आत्मविश्वासाने व्यवसाय सांभाळताना दिसल्या. मोठमोठे व्यवहार, ग्राहकांशी चर्चा,

डिझाइनची निवड, किंमतींची बोलणीसगळे त्या अतिशय सफाईदारपणे करत होत्या. काही ठिकाणी लाखो-कोट्यवधींच्या व्यवहारांची जबाबदारी महिलाच सांभाळताना दिसल्या. हे दृश्य माझ्यासाठी विशेष आनंददायी होते.

फर्निचरची खरेदी झाली आणि आता वेळ आली डेकोरेटिव्ह आयटम्सची. त्यात सर्वप्रथम नंबर होतालाइट्सचा! आमच्या एजंटने सांगितले, ''लाइट्ससाठी एका वेगळ्या शहरात जावे लागेल.'' त्या शहराचे नाव होते गुझन (). त्यांच्या दृष्टीने ते एक गाव; पण आम्हाला ते एखाद्या मोठ्या महानगरापेक्षा कमी वाटले नाही! दहा-बारा मजली इमारती आणि प्रत्येक इमारत म्हणजे जणू लाइट्सचे स्वतंत्र विश्व. एका मजल्यावर मॅन्युफॅक्चरिंग, दुसऱ्या मजल्यावर शोरूम, पुढच्या मजल्यावर ऑफिस आणि त्याच ठिकाणी ग्राहकाच्या गरजेनुसार डिझाइनमध्ये बदल करून देण्याची व्यवस्था. आणि डेकोरेटिव्ह लाइट्सचे मॉल तर अक्षरशः डोळे दिपवून टाकणारे होते. माहिती घेतल्यानंतर आम्हाला कळले की गुझन हे जगातील एक मोठे लाईट उत्पादन आणि व्यापार केंद्र आहे. तिथून जगभर मोठ्या प्रमाणावर लाइटिंग उत्पादने निर्यात केली जातात.

आम्हाला एक गोष्ट पुन्हा प्रकर्षाने जाणवली

चीनमध्ये केवळ वस्तू तयार होत नाहीत; संपूर्ण उद्योगव्यवस्था उभी केली जाते. प्रत्येक वस्तूसाठी एक विशेष केंद्र!!!

लोखंडी वस्तू असोत, दरवाजे असोत, खिळे असोत, असोत, मेडिकल उपकरणे असोत, प्लास्टिकच्या वस्तू असोत किंवा विविध शोभेच्या वस्तू, इलेक्ट्रॉनिक वस्तू, खेळणी अशा प्रत्येक प्रकारच्या वस्तूंसाठी विशिष्ट औद्योगिक क्लस्टर्स विकसित झालेले आहेत. आपल्याला हव्या त्या वस्तूसाठी प्रसिद्ध असलेल्या औद्योगिक क्लस्टरमध्ये जायचे, लाखो पर्यायांमधून निवड करायची, ऑर्डर द्यायची आणि माल जगाच्या कोणत्याही भागात पाठवायचा! ही संपूर्ण व्यवस्था पाहताना चीनची उत्पादन क्षमता, नियोजन आणि पुरवठा-साखळी यांची व्याप्ती आमच्या लक्षात आली.

चीनची विकासाची गती

मी २००६ मध्ये पाहिलेला चीन आणि आता २०२६ मध्ये पाहिलेला चीनया दोन अनुभवांमध्ये मला प्रचंड फरक जाणवला. गगनचुंबी इमारती, स्वच्छ आणि रुंद रस्ते, अनेक स्तरांवरचे फ्लायओव्हर्स, मेट्रोचे विस्तृत जाळे, रेल्वेची उत्तम व्यवस्था आणि मालवाहतुकीसाठी विकसित केलेली पायाभूत सुविधाहे सर्व पाहताना मी अक्षरशः थक्क झाले. रस्ते, मेट्रो, रेल्वे आणि मालवाहतुकीची साधने यांचा एकत्रित विचार केल्याचे स्पष्ट जाणवत होते.

''प्रवास'' फक्त रस्त्यावरच्या गाड्यांनी होत नाही!

चीनमध्ये फिरताना आणखी एक गोष्ट माझ्या लक्षात आलीसार्वजनिक वाहतुकीचा मोठ्या प्रमाणावर वापर.रस्त्यावर आठ-लेनचे मोठे रस्ते, मेट्रो, बस, रेल्वे आणि शेअर केलेल्या किंवा भाड्याच्या ई-बाईक्स आणि सायकलींचा मोठ्या प्रमाणावर वापर.

अनेक ठिकाणी लोक घराबाहेर पडल्यावर स्वतःची गाडी काढण्याऐवजी जवळची ई-बाईक किंवा सायकल घेऊन मेट्रो स्टेशन, रेल्वे स्टेशन किंवा बस स्थानकापर्यंत जाताना दिसले. म्हणजेच शहराच्या वाहतुकीचा विचार केवळ कारच्या दृष्टीने केलेला नसून संपूर्ण सार्वजनिक वाहतूक व्यवस्था एकत्रितपणे उभी केलेली दिसली. व्यक्तिगत वाहन + सार्वजनिक वाहतूक + सायकल + ई-बाईक यांचा एकत्रित वापर करून वाहतुकीचे नियोजन केलेले दिसते.

तंत्रज्ञान, शिस्त आणि सार्वजनिक व्यवस्था

चीनमध्ये मला आणखी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवलीत्यांची स्वतःची डिजिटल व्यवस्था. Google, WhatsApp यांसारख्या अनेक लोकप्रिय परदेशी सेवांऐवजी चीनमध्ये स्थानिक डिजिटल प्लॅटफॉर्म्सचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. त्यांच्या दैनंदिन व्यवहारांसाठी त्यांनी स्वतःची डिजिटल परिसंस्था उभी केली आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या बाबतीत त्यांचे परदेशी प्लॅटफॉर्म्सवरील अवलंबित्व तुलनेने कमी आहे. ही गोष्ट पाहताना मला जाणवले की एखादा देश आत्मनिर्भर होतो म्हणजे तंत्रज्ञान, डिजिटल सेवा आणि संपूर्ण व्यवस्था स्वतःच्या गरजेनुसार उभी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

पार्किंगची समस्या आणि तंत्रज्ञान

पार्किंगच्या बाबतीतही आपल्या वाहनाच्या आसपासच्या परिसरात कुठे पार्किंगची जागा उपलब्ध आहे याची माहिती डिजिटल पद्धतीने मिळते. त्यामुळे गाडी घेऊन अंदाजाने फिरत राहण्याऐवजी उपलब्ध जागेच्या दिशेने थेट जाता येते. त्यामुळे इंधन आणि वेळेची बचत होते

प्रत्येक शंभर मीटरवर... Power Bank!

आणखी एक छोटीशी पण माझ्या मनावर ठसलेली गोष्ट म्हणजे Public Power Bank Stations रस्त्यावर जागोजागी Power Bank चे स्टँड दिसायचे. मोबाइलची बॅटरी संपत आली? स्टँडमधून Power Bank घ्या. आपल्या खात्याद्वारे ती वापरा. गरज संपली की पुन्हा ती स्टँडवर परत ठेवा. इतकी साधी सुविधा, पण तिच्यामागे आहे विश्वास, शिस्त आणि सार्वजनिक मालमत्तेचा योग्य वापर करण्याची मानसिकता. हे पाहिल्यावर मनात सहज प्रश्न आला ''आपण भारतात अशी सुविधा रस्त्यावर उभी केली तर ती किती दिवस टिकेल?''

आपल्याकडे सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होण्याच्या घटना आपण अनेकदा पाहतो. विकासासाठी केवळ अत्याधुनिक तंत्रज्ञान किंवा मोठमोठ्या योजना पुरेशा नाहीत. विकासासाठी नागरिकांची मानसिकताही बदलावी लागते. आपण अनेकदा अमेरिका किंवा युरोपमधील देशांच्या प्रगतीचे उदाहरण देतो. पण चीनकडे पाहताना मला एक वेगळी गोष्ट जाणवली. चीन हा आपल्यासारखाच आशियाई देश आहे. लोकसंख्या प्रचंड आहे. तरीही त्यांनी उत्पादनक्षमता, पायाभूत सुविधा, औद्योगिक तंत्रज्ञान आणि निर्यात यामध्ये मोठी झेप घेतली आहे

आपणही आपल्या गरजेनुसार स्वतःची तंत्रज्ञान आणि उत्पादन व्यवस्था किती सक्षमपणे उभी करू शकतो? भारतामध्ये Make in India सारख्या उपक्रमांमधून उत्पादनाला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न होत

आहे. मात्र चीनने उत्पादन, औद्योगिक क्लस्टर्स, पायाभूत सुविधा, वाहतूक आणि निर्यात यांचे जे मोठे जाळे उभे केले आहे, त्याची व्याप्ती प्रत्यक्ष पाहिल्यावर त्यामागची ताकद समजते. चीनमध्ये मला सर्वांत प्रकर्षाने जाणवलेली गोष्ट म्हणजे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करणारी उत्पादनव्यवस्था. आपल्याकडे बेरोजगारी, तरुणांची क्षमता, कौशल्य आणि उद्योगनिर्मिती याबद्दल आपण नेहमी चर्चा करतो.

माझ्या मनात एक प्रश्न नक्कीच आला – विकासाच्या प्रक्रियेत आपल्या राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेचा, आपल्या निर्णयप्रक्रियेचा आणि आपल्या धोरणांच्या अंमलबजावणीचा किती परिणाम होतो?

या प्रश्नाचे उत्तर कदाचित इतके सोपे नाही. प्रत्येक देशाची राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती वेगळी असते. त्यामुळे चीनचे मॉडेल भारताने जसाच्या तसा स्वीकारावे असेही नाही. पण चीनकडून नियोजन, उत्पादनक्षमता, पायाभूत सुविधा, कौशल्यनिर्मिती आणि जागतिक बाजारपेठेसाठी उत्पादन करण्याची वृत्ती यांसारख्या अनेक गोष्टींचा अभ्यास नक्कीच करता येईल.

चीन पुढे आहे; पण भारताचीही स्वतःची ताकद आहे

IT आणि software, space technology, pharmaceuticals या क्षेत्रांमध्ये भारताने जगभरात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. म्हणून चीनची प्रगती पाहून भारताने निराश होण्याचे कारण नाही. उलट, दुसऱ्या देशाची प्रगती पाहून आपण काय शिकू शकतो? आपल्या कमतरता कुठे आहेत? आणि आपल्या ताकदीचा अधिक चांगला उपयोग कसा करू शकतो? हा विचार करण्याची गरज आहे.

शेवटी...

चीनने गेल्या काही दशकांत स्वतःला एक मोठी आर्थिक आणि औद्योगिक शक्ती म्हणून उभे केले आहे. भारतही आपल्या मार्गाने पुढे जात आहे आणि अनेक क्षेत्रांमध्ये मोठी क्षमता दाखवत आहे.माझ्यासाठी ही चीनची सफर केवळ हॉटेलसाठी फर्निचर आणि लाइट्स खरेदी करण्याची Business Tour नव्हती. ती होती एका देशाच्या विकासप्रवासाकडे जवळून पाहण्याची संधी.

डॉक्टर म्हणून गेले, पण विद्यार्थिनी म्हणून परतले!

चीनला जाण्यापूर्वी आम्ही पाच डॉक्टर मैत्रिणी होतोहॉटेलसाठी फर्निचर आणि इंटिरिअरचे साहित्य खरेदी करण्यासाठी निघालेल्या.पण परतताना आमच्या हातात फक्त फर्निचरची यादी, लाइट्सचे नमुने किंवा खरेदीचे बिल नव्हते.आमच्या मनात आले होते अनेक नवे विचार. डॉक्टरकीने मला माणसांना समजून घेणे शिकवले. उद्योजकतेने मला निर्णय घेणे शिकवले. आणि चीनच्या या व्यवसायिक प्रवासाने मला शिकवले ''जग बदलताना पाहायचे असेल, तर कधी कधी आपल्या परिचित चौकटीबाहेर पडून स्वतः प्रवास करावा लागतो.'' सर्वांत महत्त्वाचे म्हणजे देशाच्या प्रगतीची जबाबदारी फक्त सरकारची नाही; ती आपलीही आहे. आपण प्रत्येकाने आपल्या कामात प्रामाणिकपणा, शिस्त, गुणवत्ता आणि जबाबदारी आणली, तर भारताची प्रगती निश्चितच अधिक वेगाने होऊ शकते. चला, आपण सगळे एकजुटीने प्रयत्न करूया आपल्या भारताला अधिक सक्षम, स्वावलंबी, आधुनिक आणि समृद्ध बनवण्यासाठी!

जय हिंद!

Golden Memories....





अजून चालतेची वाट

आयुष्याने माझ्यावर एव्हडा विश्वास टाकलाय की मी त्यापुढे नतमस्तक आहे. मी कुठलेही आव्हान सहज पेलू शकते याची जणू त्याला खात्रीच आहे. माझ्या CIDP हेल्थ सीरीज चे आधीचे एपिसोड तुम्हाला माहिती आहेतच. आता नुकतेच घडलेले काही नवीन. जीवना तू तसा मी अशी.



डॉ.मृदूला चांडक

प्रसंग १

कुणा कुणाला वाटून जाते की मी माझ्या अशा अवस्थेत conference वगैरे कशाला अटेंड करते? पण मी एक प्रॅक्टिसिंग फिजिशियन आहे हे विसरू शकत नाही ना! महेश, मुलगा आणि सून पण मदतीला असते. कधी एखादी विश्वासू मदतनीस. तर झाले असे की एकदा कुणालाही वेळ नव्हता. ड्राइवर पण नव्हता. तर मी रिक्षाने जायचे ठरवले. होय. रिक्षाने चक्क! मी जिद्दी आहेच. माझ्या फिजिओ कडून हट्टाने रिक्षात कसे चढायचे ते मागे शिकून घेतले होते. (cidp मधे पॉवर लॉस मुळे ते कठीण होते) . युक्तीने मी स्थांनापन्न तर झाले पण हाय रे दैवा! रिक्षा थांबली ती jw मॅरियट च्या पायरीच्या फुट भर अलीकडे. वाटले पुढे घ्या सांगावे पण पाहू म्हंटले. एक पाय खाली उतरवला आणि किंचित उडी सारखे वेंधून युक्तीने दुसरा पाय आणि मी पायउतार झालो . बापरे! मांडीतून कळा गेल्या की! जीव मुठीत धरून लेक्चर्स ऐकले. वेदना कमी होत नव्हत्या. एक्स rays, mri झाले. सगळे नार्मल सांगत होते. वेदना कमी होत नव्हत्या. शेवटी एका ऑर्थो चे म्हणणे पडले की मॅडम इथे "काहीतरी" आहे . endocrinologist ला दाखवा. आणि इथे माझ्या प्रश्नाची किल्ली सापडली. त्याने एक्स ray पाहूनच निदान केले. माझ्या हिस्ट्री वरून टेस्ट करवल्या आणि pth पॅरथ हार्मोन सुरू केले आणि जादूच्या कांडी प्रमाणे 15 दिवसात हीलिंग सुरू झाले. हेअरलाइन फ्रैक्चर तर बरे झालेच पण दुसऱ्या पायावरचा ताण पण कमी झाला. चला सुटला प्रश्न. पण खूप चिकाटीने शोध घेतल्यावरच.

प्रसंग २

काही काळ शांततेत गेला. सगळे diagnostic सेंटरस तर माझे जणू घर अंगण झालेत. बरेच जण सीटी एमआर च्या गुहेत घाबरतात. (क्लॉस्ट्रोफोबिया) पण माझे असख्य वेळा झाल्याने मला ती अलीबाबाची गुहा वाटते. तर सहज स्नान करताना उजव्या बाजूला गाठ लागली.जणू काही आता ह्याच तपासण्या बाकी होत्या!! त्याचाही अनुभव राहून जायला नको. mammosonography आणि mammography झाली. biopsy पण ठरली. पण मी ठाम होते. या वेळी मी जाहीर केले. हे आयुष्या, माझ्या वाटणीच्या सर्व तपासण्या आणि उपचारांचा शेयर आता संपला आहे. ca निघाला तर मी काहीही करणार नाहीये. नो मोर ट्रीटमेंट्स!! पण एका radilologist and breast सर्जन ने म्हटल्याप्रमाणे that was infllamatory ductal ectasia only and it gets resolved. biopsy पण नाही लागली. पण या घटनेत मॅमोग्राफी आणि सर्जिकल साइड चा अनुभव घेतला. देवाने माझ्या वाटेला काहीही कमी न सोडण्याचा जणू

चंगच बांधला होता.

प्रसंग ३

माझ्या खाण्या पिण्याच्या खूप खोडी होत्या.घरात तर लाड पुरवले जात. पण हॉस्टल वर खूप कठीण प्रसंग! मेस मधे एक विचित्र नियम होता. दही की पापड? काही लॉजिक नव्हते त्याला. मी पैसे भरून अजून एक वाटी दही घेत असे आणि दही साखर पोळी वर रहात असे. माझे शेट्टी च्या भाज्यांशी जमत नव्हते. आणि क्लिनिक उशीरा सुटले तर गार अन्न घशाखाली उतरत नसे.आणि फ्रूट्स गारच आवडत ती रूम temp ची खावीशी वाटत नसत.(अर्थात पीजी हॉस्टल ला केपी चा डबा लावल्यावर ug चा shetty भाभी भय्या बरे म्हणायची वेळ आली.) तर अशी मी जेंव्हा माझ्या स्टेरॉइडल आणि immunosuppresants मेड्स मुळे जेंव्हा वजन दुप्पट झाले तेंव्हा आहारतज्ञ सांगेल तसे निमूटपणे diet करायला शिकले. मला सुधरवण्याचा आयुष्याने पणच केलेला जणू!

माझ्या डैडी ची आठवण येते खूप. गेले १८ वर्षे फिझियोथेरपी नियमित करणे हा माझ्या आयुष्याचा भाग झालाय. लहानपणी डॅडी व्यायाम करायला सांगत ते न ऐकता मी चित्रे काढत बसे किंवा अभ्यास करत बसे. तेंव्हा त्यांचे ऐकले नाही आणि आता घरात सुसज्य फिजिओ यूनिट तयार केले. माझी एक मैत्रीण म्हणते की हे तुझे जणू एक मंदिरच आहे. येथे शरीर साधनेचा पूजा प्रसाद चढवूनच दिवस पार पडतो. डॅडी ची इच्छा अशी वेगळ्या तऱ्हेने उशिरा पूर्ण झाली म्हणायची!!

जेंव्हा मला काही इंजेक्शन्स साठी day care icu ला admit व्हावे लागते त्यानंतर 4/5 दिवस खाणेपिणे जात नाही, शक्तिपात होतो आणि ही व्यायामाने कमावलेली ताकत गमावली जाते आणि पुन्हा पहिल्या पानावरून थेरपी सुरू होते.

प्रसंग ४

माझ्या शोल्डर चा पण एक किस्सा आहे. bilat shoulder OA. कुशीवर वळताना पण कधी पेन्स होतात. सगळ्यांचे अनुभव झालेले. दीनानाथ, चेलाराम. ज्युपिटर. आता संचेतीचा राहीला होता. बहुतेकांनी जॉइंट रिप्लेसमेंट सांगितली. पण माझ्यातला फिजिशियन मला माझ्या इम्यून compramize state मुळे फिटनेस देत नव्हता.मी सर्जरी कदापि करणार नव्हते आणि सगळ्यांना कन्सर्वटिव ट्रीटमेंट मागत होते. संचेती ला पण दुखत असेल तर सर्जरी च करायला सांगितले. पण माझी विनंती ऐकल्यावर म्हणाले नको करूस कारण joint accept नाही झाला तर प्रश्न होईल. we will go for conservative.आणि यात physiotherapy चा मोठा रोल आहे. माझी थेरेपिस्ट एक devine soul आहे.ज्या ममतेने ती कनेक्ट होते आणि प्रश्न समजून घेते त्याला तोड नाही.

(मी माझ्या स्वतः च्या अनुभवामुळे better डॉक्टर होत आहे असे जाणवते.)

मी जे नेहमी माझे गुडघ्यापर्यंतचे शूज वापरते ते तिच्याच देखरेखीखाली कस्टमाइज्ड बनवले आहेत.माझ्या पायाची मसल पॉवर कमी झाली आणि ligaments ची वाट लागली आहे. त्यामुळे झालेल्या डिफॉर्मिटीज गृहीत धरून त्याला एडजस्ट होतील असे ते एकदम खास शूज आहेत. सिंड्रेला सारखेच यूनीक! in other सेन्स.

प्रसंग ५

